cmyk

## संपादकीय

### बंगालमध्ये महाराष्ट्राची पुनरावृत्ती?

पश्चिम बंगालच्या राजकारणाने अखेर तोच वळणदार आणि धक्कादायक मार्ग स्वीकारला आहे, ज्यावरून काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील राजकारण गेले होते. तृणमूल काँग्रेसमधील अभूतपूर्व बंडखोरी, पक्षातील मोठी फूट आणि नेतृत्वाविरोधात उभे राहिलेले आमदार यामुळे केवळ एका पक्षाचे अंतर्गत समीकरण बदललेले नाही; तर भारतीय प्रादेशिक पक्षांच्या भवितव्याबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–७७ | शनिवार दि.०६ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### अखेर अन्नामलाईंचा राजीनामा मंजूर

चेन्नई: दाक्षिणात्य राजकारणात भारतीय जनता पक्षाचा प्रमुख चेहरा मानले जाणारे तमिळनाडूचे माजी प्रदेशाध्यक्ष के. अन्नामलाई यांनी भाजपला रामराम ठोकला आहे. अन्नामलाई यांनी केवळ अध्यक्षपदच नव्हे, तर पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचाही राजीनामा दिला असून पक्षाने तो मंजूर केला आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी अन्नामलाई यांचा राजीनामा तात्काळ प्रभावाने स्वीकारला असल्याचे अधिकृतपणे जाहीर केले आहे. भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि मुख्यालय प्रभारी अरुण सिंह यांच्या स्वाक्षरीने प्रसिद्ध झालेल्या पत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे की, के. अन्नामलाई आता भारतीय जनता पक्षाचे प्राथमिक सदस्यही राहिलेले नाहीत. हा राजीनामा मंजूर होण्यापूर्वी दिल्लीत भाजपच्या शीर्ष नेत्यांमध्ये प्रचंड खलबते आणि हायव्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला.

### भारताचा विकास दर ७.७% वर

नवी दिल्ली: जागतिक अनिश्चितता, भू-राजकीय तणाव आणि इंधनाच्या वाढत्या किमती यांसारख्या आव्हानांना न जुमानता भारताच्या अर्थव्यवस्थेने आर्थिक वर्ष २०२५–२६ (२६) मध्ये वेग घेतला आहे. सरकारी आकडेवारीनुसार, वास्तविक जीडीपी (स्थूल अंतर्गत उत्पादन) ७.७% नोंदवला गेला आहे, जो मागील आर्थिक वर्षात ७.१% होता. सरकारच्या प्राथमिक अंदाजांनुसार, मागील वर्षाच्या तुलनेत देशाच्या आर्थिक विकासाचा वेग वाढला आहे. जानेवारी–मार्च तिमाहीतील मजबूत कामगिरीमुळे स्थूल अंतर्गत उत्पादन दर ७.७% वर पोहोचला आहे. केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने आज (दि. ५ जून) जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, जानेवारी–मार्च या शेवटच्या तिमाहीत अर्थव्यवस्थेने ७.८% दराने झेप घेतली आहे. यामुळे आर्थिक वर्षाच्या अखेरपर्यंत देशाच्या विकासाचा वेग मजबूत राहिल्याचे स्पष्ट झाले आहे.

### आता झारखंडमध्ये इंडिया आघाडीत फूट

नवी दिल्ली: पुढील आठवड्यात सोमवारी (दि.८) इंडिया आघाडीची बैठक होणार आहे. या बैठकीपूर्वीच मित्रपक्षांमधील समन्वयात बिघाड होऊ लागला आहे. तामिळनाडूमध्ये काँग्रेस आणि डीएमके यांच्यातील तणावपूर्ण संबंध जेमतेम सुधारले असून, झारखंडमध्येही असाच राजकीय डावपेच खेळला जात आहे. काँग्रेसने राज्यातील दोन रिक्त राज्यसभा जागांसाठी संख्याबळ निश्चित न करताच आपल्या उमेदवारांची घोषणा केली. जेएमएमचा आरोप आहे की, त्यांच्याशी सल्लामसलत न करताच ही नावे जाहीर करण्यात आली. जेएमएमने घाईघाईने बैठक बोलावून दोन्ही जागांवर आपले उमेदवार उभे करण्याची तयारी केली. यामुळे आघाडीत फूट पडली आहे. दरम्यान, सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, झारखंडमधील काँग्रेसशासित जागेसंदर्भात पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी हेमंत सोरेन यांच्याशी दोनदा आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी स्वतः एकदा संवाद साधला.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**

बीड, दि.०५ जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५१.०० क्विंटल | २,१४१ | ३,४४० | २,४३३ |
| ज्वारी/हायब्रिड: १३७.०० क्विंटल | २,२१० | ४,२९२ | २,८९७ |
| मका/लोकल: ३०.०० क्विंटल | २,०१८ | २,०१८ | २,०१८ |
| तूर: ४.०० क्विंटल | ६,४०१ | ७,३५१ | ६,९२७ |
| उडीद: १.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| बाजरी: ५३.५० क्विंटल | २,१५१ | २,४५० | २,२५७ |
| मुग: ८.०० क्विंटल | -- | -- | -- |
| सोयाबीन: १.५० क्विंटल | ७,१०० | ७,१०० | ७,१०० |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,६०० | ५,७०० | ५,६५० |

# महाडीबीटी पोर्टलवर बियाण्यांचे वितरण

## वितरणाच्या अभिनव उपक्रमात शेतकऱ्यांनी अर्ज करण्याचे दत्तात्रय भरणे यांचे आवाहन

पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने यंदा महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून खरीप हंगामासाठी आवश्यक असलेली प्रमाणित बियाणे आता महाडीबीटी पोर्टलवर प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. इच्छुक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर जाऊन तात्काळ अर्ज करावेत, असे आवाहन राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले.**



राज्यात यंदा खरीप हंगाम प्रमाणित बियाणे व प्रात्यक्षिक कार्यक्रम राबविण्यात येणार असून त्याअंतर्गत शेतकऱ्यांना विविध पिकांची गुणवत्तापूर्ण बियाणे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. यामध्ये सोयाबीन, मूग, उडीद, भूईमुग, बाजरी आणि कापूस या प्रमुख पिकांचा समावेश आहे.तसेच या कार्यक्रमांतर्गत राज्यभरात तब्बल २ लाख प्रात्यक्षिके राबविण्यात येणार असून त्याद्वारे शेतकऱ्यांना सुधारित तंत्रज्ञान, आधुनिक कृषी पद्धती आणि गुणवत्तापूर्ण निविष्ठांचा प्रत्यक्ष अनुभव दिला जाणार आहे. योजनेअंतर्गत राज्यभरातील शेतकऱ्यांसाठी सुमारे ३ लाख क्विंटल बियाण्यांचा साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामध्ये ६६ हजार ७५० क्विंटल सोयाबीन तसेच ३५ हजार ५०० क्विंटल भूईमूग बियाण्यांचा समावेश असून इतर खरीप पिकांची बियाणेदेखील महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध राहणार आहेत. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, ''राज्यातील शेतकऱ्यांना वेळेत आणि दर्जेदार बियाणे उपलब्ध व्हावीत ▶▶ पान २ वर

# काँग्रेस मविआतून बाहेर पडणार?

## वरिष्ठांना पाठवला प्रस्ताव, राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ



मुंबई । प्रतिनिधी

विधान परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीत मतभेद उफाळून आल्याचे चित्र दिसत आहे. पुणे विधान परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे उमेदवार श्रीकांत पाटील यांनी उमेदवारी मागे घेतल्यानंतर काँग्रेस आणि शिवसेना (ठाकरे गट) मध्ये नाराजी वाढली असून, पुण्यात महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा प्रस्ताव वरिष्ठ नेत्यांकडे पाठवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना शिवसेना (ठाकरे गट) नेते वसंत मोरे यांनी शरद पवार गटावर गंभीर आरोप केले आहेत. 'महाविकास आघाडीचा तिसऱ्यांदा विश्वासघात झाला आहे. आमच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम शरद पवार गटाने केले,' असा आरोप त्यांनी केला. वसंत मोरे म्हणाले की, अंकुश काकडे यांच्या उमेदवारीबाबत आधीच सेटलमेंट झाल्याची माहिती मिळाली होती. ''बारामतीतील भाऊबंदकी बारामतीतच करावी. ठाण्यात मदत केली म्हणून साताऱ्यात शिवसेनेला मदत करणार, अशी राजकीय देवाणघेवाण सुरू असेल तर त्याचा फटका ▶▶ पान २ वर

# मराठा समाजाला ओबीसींप्रमाणे ८ योजनांमध्ये सवलती!

## फडणवीस सरकारचा मोठा निर्णय, सर्व शैक्षणिक सवलती आणि सोयी-सुविधा लागू होणार



मुंबई । प्रतिनिधी

**मराठा समाजाच्या आर्थिक आणि शैक्षणिक प्रगतीसाठी फडणवीस सरकारने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि मोठा निर्णय घेतला आहे. आता इतर मागासवर्गीय समाजाप्रमाणेच मराठा समाजातील विद्यार्थ्यांनाही सर्व शैक्षणिक सवलती आणि सोयी–सुविधा लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय शासनाने घेतला आहे.**

शासनाने घेतलेल्या या निर्णयानुसार, ओबीसी प्रवर्गाच्या धर्तीवर मराठा समाजासाठी तब्बल ८ विशेष योजना सुरू करण्यात येणार आहेत. यामुळे मराठा समाजातील हजारो विद्यार्थ्यांना उच्च आणि व्यावसायिक शिक्षणासाठी मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे. दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील उच्च शिक्षणासाठी ओबीसी विद्यार्थ्यांना मिळणारी शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना आता मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांनाही लागू होईल. मराठा समाजातील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष मोटार वाहन चालक व वाहक प्रशिक्षण योजना सुरू करण्यात येणार आहे. इयत्ता ९ वी ते १२ वीच्या माध्यमिक ▶▶ पान २ वर

> **सवलती आपोआप लागू होणार...**
>
> भविष्यात इतर मागास प्रवर्गास ज्या काही नवीन शैक्षणिक सवलती व सोयी–सुविधा लागू करण्यात येतील, त्या सर्व सवलती पुढील कोणत्याही नवीन आदेशाची वाट न पाहता मराठा समाजास आपोआप लागू होतील, अशी अत्यंत महत्त्वाची तरतूदही या निर्णयात करण्यात आली आहे.

# कॉकरोच जनता पार्टीचे आज दिल्लीत आंदोलन

## विरोधातील याचिकेवर तातडीच्या सुनावणीस दिल्ली उच्च न्यायालयाचा नकार

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

जंतरमंतर येथे ६ जून रोजी कॉकरोच जनता पार्टीकडून आयोजित करण्यात आलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाला प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास दिल्ली उच्च न्यायालयाने गुरुवारी नकार दिला. यामुळे ठरल्याप्रमाणे कॉकरोच जनता पार्टीचे आज दिल्लीत आंदोलन होणार असल्याचे संकेत मिळाले आहेत.




सेव्ह इंडिया फाउंडेशन या संस्थेने दाखल केलेल्या याचिकेत कॉकरोच जनता पार्टीकडून सोशल मीडियावर समन्वित मोहीम राबवून मोठ्या प्रमाणावर तरुणांना आंदोलनासाठी एकत्र येण्याचे आवाहन करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. या आंदोलनामुळे सार्वजनिक सुव्यवस्था बिघडण्याची तसेच महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर परिणाम होण्याची शक्यता असल्याचे याचिकेत नमूद करण्यात आले आहे. न्यायमूर्ती सौरभ बॅनर्जी आणि न्यायमूर्ती अमित शर्मा यांच्या सुट्टीकालीन खंडपीठासमोर या प्रकरणाचा उल्लेख करण्यात आला. मात्र, खंडपीठाने तातडीच्या सुनावणीची मागणी फेटाळून लावली. याचिकेत केंद्र सरकार, ▶▶ पान २ वर

# मान्सून महाराष्ट्राच्या वेशीवर!

## गोव्यात दाखल, आज तळकोकणात लावणार हजेरी

पुणे । प्रतिनिधी

**मान्सून केरळममधून अवघ्या २४ तासांत गोव्यापर्यंत आला आहे. शनिवारी पहाटे तळकोकणात येईल, असा अंदाज हवामानशास्त्र विभागाने वर्तवला आहे. मान्सूनचा प्रचंड वेग पाहता तो पुढील २४ ते ४८ तासांत पुणे आणि मुंबई शहर काबीज करेल असाही अंदाज आहे.**

गुरुवारी दुपारी दीड वाजता मान्सून केरळमध्ये दाखल झाला. यंदा १ जून ऐवजी तीन दिवस उशिरा ४ जून रोजी आला. एरव्ही तेथून पुढे पाच दिवसांत तो गोवा आणि महाराष्ट्रात येतो. मात्र, यंदा त्याचा वेग प्रचंड असल्याने अवघ्या २४ तासांत त्याने गोवा राज्यापर्यंत मजल मारली आहे. त्यामुळे शनिवारी (६ जून) तो तळकोकणसह पुणे आणि मुंबईपर्यंतचा भाग २४ ते ४८ गाठण्याचा अंदाज आहे. मान्सून वेगाने गोव्यापर्यंत आल्याने उत्तर भारतातही तो वेगाने पुढे जाण्याची शक्यता आहे. अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागराची शाखा अशा दोन्ही मार्गाने तो देशभरात सक्रिय होत आहे. त्यामुळे शुक्रवारी देशातील १७ राज्यांना पावसाचा अलर्ट देण्यात आला आहे. शुक्रवारी मान्सूनने तामिळनाडू आणि गोव्याच्या काही भागांमध्ये प्रवेश केला. दरम्यान, पुढील ७ दिवसांत ▶▶ पान २ वर

# तणाव कायम : भारताकडून सिंधू जल करार स्थगितच

दिल्ली । वृत्तसंस्था

**२६ निष्पाप लोकांचे बळी घेणाऱ्या पहलगाम हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी भारताने मे २०२५ मध्ये दहशतवादी पायाभूत सुविधांना लक्ष्य करत ऑपरेशन सिंदूर ही लष्करी कारवाई सुरू केली होती. या कारवाईनंतरच हा करार स्थगित ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. सिंधू जल करार स्थगित होऊन एक वर्षापेक्षा जास्त काळ लोटल्यानंतरही या धरणाचे दरवाजे बंदच आहेत.**

सिंधू जल कराराच्या व्यापक निलंबनाशी जोडलेली ही सातत्यपूर्ण पावले, या प्रदेशातील भारताचे जल व्यवस्थापन आणि जलविद्युत रणनीतीमधील बदल अधोरेखित करतात. परराष्ट्र मंत्रालयाने या करारावरील सुरू असलेल्या कायदेशीर वादांवरही भाष्य केले की, जलसाठा ▶▶ पान २ वर

# एमपीएससीच्या अंतिम निवडीत हुकलेल्या उमेदवारांना नव्या संधी उपलब्ध

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) विविध स्पर्धा परीक्षांच्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचूनही अंतिम निवड यादीत स्थान मिळवू न शकलेल्या गुणवंत उमेदवारांसाठी आयोगाने महत्वाचा निर्णय घेतला आहे. अशा उमेदवारांना खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी उद्योग विभागामार्फत 'मैत्री २.०' पोर्टल अंतर्गत 'निपुण सेतू' हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात येणार आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) 'प्रतिभा सेतू' या उपक्रमाच्या धर्तीवर महाराष्ट्रात 'निपुण सेतू' हा उपक्रम ▶▶ पान २ वर

# पवार फुल राजकारण! लखानी आठवले पॅरागॉन चे काय

बीड–पुणे । प्रतिनिधी

**महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते राजकारणातील महागुरू शरद पवार यांची कन्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या कन्येचे लखानी यांच्या मुलासोबत लग्न होणार आहे. आता हेच लखानी जे सुळे यांचे व्याही आहेत, आता ते थेट सभागृहामध्ये जाणार आहेत. सुळे, पवार आणि लखानी यांच्या या नात्यामुळे गेली अनेक दशके आधी राज्य गाजवणाऱ्या लखानी या ब्रँडेड चप्पलची आठवण झाली. त्याच्या जोडीला पॅरागॉन देखील होते. सुळे यांचे व्याही लखानी आता लोकप्रतिनिधी झाले आणि याच आडनावामुळे लखानी चप्पल ब्रँड होता हे आठवले, पण त्यासोबतच पॅरागॉन देखील होती म्हणून सहजच आठवले की, लखानी नंतर आता पॅरागॉन यांचे देखील मागेपुढे सभागृहात आगमन होऊ शकते का ? त्यासाठी पुन्हा पवार फुल राजकारण होऊ शकेल का, अशी चर्चा जनसामान्यातून होताना दिसत आहे.**




ग्रामीण भागात एकेकाळी एक वाक्य खूप प्रसिद्ध होते ''पायात लखानी, अन् डोक्यावर...'' (पुढे प्रत्येक जण आपापल्या सोयीने पक्ष किंवा नेत्याचे नाव जोडायचा). वर्षानुवर्षे ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेसाठी लखानी म्हणजे पायातील मजबूत, स्वस्त आणि टिकाऊ चप्पल, अशी ओळख होती. कडक उन्हात, शेतातील चिखलात आणि गावाकडच्या खडीच्या रस्त्यावर पाय पोळू नये म्हणून ज्या लखानीने ग्रामीण माणसाची साथ दिली, तो 'लखानी' ब्रँड आता थेट राज्याच्या सर्वोच्च सभागृहात पोहोचला आहे. निमित्त ठरलेय, खासदार सुप्रिया सुळे यांचे व्याही. ग्रामीण संस्कृतीत लखानी ही केवळ चप्पल नव्हती, तर ती गरिबी आणि संघर्षाची ओळख होती. ''पायात लखानी आणि हातात सत्तेची चावी'' यातले अंतर खूप मोठे असते, पण म्हणतात ना, राजकारणात काहीही अशक्य नसते. जी ओळख आजपर्यंत शेताच्या बांधावर आणि गावाकडच्या पारावर मर्यादित होती, तीच ओळख आता थेट विधानमंडळाच्या किंवा संसदेच्या वातानुकूलित सभागृहात मानाने मिरवणार आहे. ग्रामीण माणसाच्या पायातली चप्पल जेव्हा थेट सभागृहाचा उंबरठा ओलांडते, तेव्हा तो केवळ एका व्यक्तीचा नाही, तर एका नावाचा कॉर्पोरेट आणि राजकीय प्रवास ठरतो. आपल्या नावाप्रमाणे मजबूत आणि टिकाऊ अशीच परिस्थिती सभागृहात पाहावयास मिळेल, अशी अपेक्षा आहे. ▶▶ पान २ वर

> **पवारांचा 'आशीर्वाद'**
>
> महाराष्ट्राच्या राजकारणात पवार नावाचा आशीर्वाद ज्याच्या पाठीशी उभा राहतो, त्याचे नशीब बदलायला वेळ लागत नाही. मग तो एखादा कट्टर कार्यकर्ता असो, किंवा नात्यागोत्यातील नवखा माणूस. सुप्रिया सुळे यांच्याशी सोयरिक जुळल्यानंतर लखानी या नावाला एक वेगळीच राजकीय वजनदार किनार मिळाली. पवारांच्या या राजकीय किमयेमुळेच, कालपर्यंत केवळ पायातली चप्पल म्हणून ओळखला जाणारा हा ब्रँड, आज थेट लोकप्रतिनिधी म्हणून सभागृहात जाऊन बसला आहे. यालाच म्हणतात, पवारांची दूरदृष्टी आणि नात्याला दिलेली राजकीय जोड.!

cmyk

## अग्रलेख

# बंगालमध्ये महाराष्ट्राची पुनरावृत्ती? तृणमूलमधील फुटीचे दूरगामी परिणाम

पश्चिम बंगालच्या राजकारणाने अखेर तोच वळणदार आणि धक्कादायक मार्ग स्वीकारला आहे, ज्यावरून काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील राजकारण गेले होते. तृणमूल काँग्रेसमधील अभूतपूर्व बंडखोरी, पक्षातील मोठी फूट आणि नेतृत्वाविरोधात उभे राहिलेले आमदार यामुळे केवळ एका पक्षाचे अंतर्गत समीकरण बदललेले नाही; तर भारतीय प्रादेशिक पक्षांच्या भवितव्याबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पक्षाची स्थापना करणाऱ्या आणि दशकांहून अधिक काळ बंगालच्या राजकारणावर अधिराज्य गाजवणाऱ्या ममता बॅनर्जी यांच्यासाठी हा सर्वांत मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. विधानसभा अध्यक्षांनी ऋतब्रत बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील आमदारांच्या गटाला स्वतंत्र गट म्हणून मान्यता देत त्यांची विरोधी पक्षनेतेपदी नियुक्ती केली, तो क्षण तृणमूल काँग्रेसच्या इतिहासातील निर्णायक टप्पा ठरला. ८० पैकी तब्बल ६० आमदारांनी पक्ष नेतृत्वाविरोधात भूमिका घेतल्याने हा केवळ मतभेदांचा प्रश्न राहिलेला नाही; तर तो नेतृत्वावरील विश्वास ढासळल्याचा स्पष्ट संदेश आहे. पक्ष संघटना, नेतृत्व आणि राजकीय नियंत्रण या तिन्ही स्तरांवर ममता बॅनर्जी यांची पकड कमकुवत होत असल्याचे हे लक्षण मानावे लागेल.

काही दिवसांपूर्वीपर्यंत पक्षविरोधी कारवायांचा आरोप करून ज्यांना निलंबित करण्यात आले होते, त्याच नेत्यांनी बहुसंख्य आमदारांना आपल्या बाजूला वळवून पक्षालाच आव्हान दिले. भारतीय राजकारणात हा प्रकार नवीन नाही. महाराष्ट्रात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जे घडले, त्याचीच पुनरावृत्ती बंगालमध्ये दिसत आहे. पूर्वी पक्षफोड म्हणजे वैचारिक संघर्ष किंवा स्वतंत्र राजकीय भूमिका मानली जात असे. आता मात्र संख्याबळ, कायदेशीर तरतुदी आणि संघटनात्मक नियंत्रण यांच्या आधारे पक्षावर मालकी हक्क सांगण्याची नवी राजकीय संस्कृती उदयास आली आहे.

पक्षांतरविरोधी कायद्याची तरतूद मूळतः लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी करण्यात आली होती. मात्र, कालांतराने त्याच कायद्यातील अपवाद आणि तांत्रिक तरतुदींचा वापर करून मोठ्या प्रमाणावर गटबाजीला कायदेशीर संरक्षण मिळू लागले आहे. दोन–तृतीयांश आमदारांचे समर्थन मिळाल्यास अपात्रतेची कारवाई टाळता येते, ही बाब आता अनेक राजकीय बंडखोरींचे प्रमुख शस्त्र बनली आहे. बंगालमधील घडामोडींनी पुन्हा एकदा दाखवून दिले की, राजकारणात भावनिक निष्ठेपेक्षा आकड्यांचे गणित अधिक प्रभावी ठरत आहे.

विशेष म्हणजे, बंडखोर गटाने अत्यंत सावध आणि राजकीयदृष्ट्या परिपक्व भूमिका घेतल्याचे दिसते. त्यांनी ममता बॅनर्जी यांच्यावर थेट टीका टाळली आहे. उलट, त्या आमच्या नेत्या आहेत, असे सांगत त्यांनी संघर्षाचे केंद्र नेतृत्वाऐवजी संघटनात्मक निर्णयांवर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. ही रणनीती महाराष्ट्रातही यशस्वी ठरली होती. मूळ पक्षाच्या विचारसरणीशी आणि संस्थापकांच्या वारशाशी निष्ठा कायम असल्याचा दावा करत बंडखोर गटांनी जनतेसमोर स्वतःला वैध पर्याय म्हणून उभे केले होते. बंगालमध्येही तसाच प्रयोग होताना दिसतो. या फुटीमुळे तृणमूल काँग्रेसच्या संघटनात्मक सामर्थ्यावर मोठा परिणाम होणार आहे. पक्षातील महत्त्वाच्या पदांवर नव्या नियुक्त्या, बंडखोर नेत्यांचा वाढता आत्मविश्वास आणि प्रभावी नेत्यांचे पदत्याग हे सर्व संकेत पक्षातील अस्थिरता अधोरेखित करतात. विशेषतः दीर्घकाळ पक्षाचे विश्वासू मानले गेलेले नेते जर नेतृत्वापासून दूर जाऊ लागले, तर कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम आणि असुरक्षितता वाढते. कोणत्याही राजकीय पक्षासाठी ही स्थिती अत्यंत धोकादायक असते.

या संपूर्ण प्रकरणाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे विधानसभा अध्यक्षांची भूमिका. महाराष्ट्रातील राजकीय संघर्षात सर्वोच्च न्यायालयाने अनेक निर्णयांचे अंतिम परीक्षण अध्यक्षांच्या अधिकारक्षेत्रात सोपविले होते. त्यानंतर संख्याबळ, पक्ष संघटना आणि विधिमंडळातील समर्थन या निकषांच्या आधारे निर्णय घेतले गेले. बंगालमध्येही अध्यक्षांनी तत्परतेने निर्णय घेतल्याने राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले आहे. यामुळे न्यायालयीन आणि घटनात्मक प्रक्रियांच्या मर्यादा व परिणामकारकतेबाबतही चर्चा सुरू होणार आहे.

पश्चिम बंगालचा राजकीय इतिहास पाहिला, तर सत्तेवरून खाली आलेल्या पक्षांना पुन्हा पूर्वीचे वैभव मिळविणे कठीण गेले आहे. काँग्रेसचा प्रभाव कमी झाला, त्यानंतर डाव्या पक्षांचे दीर्घकालीन वर्चस्व संपुष्टात आले. एकेकाळी अभेद्य वाटणाऱ्या राजकीय किल्ल्यांचे अवशेष इतिहासात जमा झाले. त्यामुळे तृणमूल काँग्रेससमोर उभे राहिलेले संकट हे केवळ तात्पुरते राजकीय आव्हान नाही; तर पक्षाच्या अस्तित्वाशी निगडित प्रश्न आहे. याशिवाय भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे निर्माण झालेली प्रतिमा, केंद्रीय तपास यंत्रणांच्या चौकशा, संघटनात्मक असंतोष आणि निवडणुकीतील घसरण या सर्व गोष्टींचा एकत्रित परिणाम तृणमूलवर होताना दिसत आहे. अशा परिस्थितीत पक्षातील मोठी फूट ही नेतृत्वासाठी दुहेरी संकट ठरते. बाह्य विरोधकांशी सामना करण्यापेक्षा अंतर्गत बंडखोरी अधिक घातक असते, कारण ती पक्षाच्या पायाभूत रचनेलाच हादरा देते. भारतीय प्रादेशिक पक्षांसाठीही या घटनाक्रमात एक मोठा धडा दडलेला आहे. व्यक्तिकेंद्री नेतृत्व, मर्यादित अंतर्गत लोकशाही आणि उत्तराधिकारी नेतृत्वाचा अभाव यामुळे अनेक पक्ष संकटात सापडत आहेत. करिष्माई नेत्यांच्या बळावर उभे राहिलेले पक्ष मजबूत संस्थात्मक रचना निर्माण करण्यात अपयशी ठरल्यास, एका मोठ्या धक्क्याने त्यांची घडी विस्कटू शकते. बंगालमधील घडामोडी या वास्तवाची आठवण करून देतात. आता सर्वांचे लक्ष ममता बॅनर्जी यांच्या पुढील राजकीय पावलांकडे लागले आहे. त्या संघटना पुन्हा एकत्र आणण्यात यशस्वी ठरतात की संघर्ष अधिक तीव्र होतो, यावर तृणमूलचे भवितव्य अवलंबून असेल. बंगालच्या राजकारणात अनेक अनपेक्षित घडामोडी घडल्या आहेत; त्यामुळे तृणमूलचे राजकीय भविष्य आजच निश्चित झाले आहे, असे म्हणणे धाडसाचे ठरेल. मात्र एवढे निश्चित की, या बंडखोरीने बंगालच्या राजकारणात नवा अध्याय सुरू केला आहे. हा अध्याय तृणमूलच्या पुनरुज्जीवनाचा ठरेल की पक्षाच्या अस्ताचा, याचे उत्तर काळच देईल.

# ‘विरोधी पक्ष फोडा’ आधुनिक लोकशाही बळकट करा! सरकारचेनवे धोरण....

**सध्या राजकारणात सत्ताधिश सरकारकडून रोज नवीन प्रयोग केला जातोय.विविध राज्य सरकार स्थापनेच्या लालसे पोटी त्या त्या राज्यातील प्रादेशिक पक्षाचे अस्तित्व संपुष्टात आणण्यासाठी पक्षांतर्गत नाराज गटाला हाताशी धरून पाहिजे ती मदत पुरवुन त्या पक्षात फुट पाडायची व स्वतःला हवे तशे सरकार स्थापन करावयाचे हा नवीन पायंडा आकार घेत आहे. लोकशाहीत विरोधी पक्ष फोडण्याचे धोरण हे सत्तेच्या केंद्रीकरणाला आणि राजकीय अस्थिरतेला जन्म देणारे एक घातक पाऊल आहे. यामुळे सशक्त विरोधी पक्षाचा अभाव निर्माण होऊन सत्ताधाऱ्यांवर अंकुश राहत नाही, परिणामी लोकशाही मूल्यांचा –हास होतो.**

लोकशाही व्यवस्था ही प्रामुख्याने सत्ताधारी आणि विरोधी पक्ष या दोन प्रमुख खांबांवर उभी असते सत्ताधारी पक्ष जर देशाचा किंवा राज्याचा गाडा चालवत असेल, तर विरोधी पक्ष त्या कारभारावर योग्य नियंत्रण ठेवण्याचे काम करतो. मात्र, अलीकडच्या काळात सत्तेत राहण्यासाठी किंवा आपले वर्चस्व कायम ठेवण्यासाठी ‘विरोधी पक्ष फोडणे’ किंवा आमदारांचे–खासदारांचे ‘पक्षांतर’ घडवून आणणे हे एक सोयीचे राजकीय धोरण बनले आहे. महाराष्ट्र, हरियाणा, बिहार, आसाम, ओरिसा, झारखंड, बंगाल, मध्य प्रदेश,उ त्तर प्रदेश,पंजाब, हिमाचल प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक,दिल्ली या राज्यासह अनेक राज्यात सत्ताधारी केंद्र सरकार कडून प्रादेशिक व विरोधी पक्षाना फोडून त्यांचे अस्तित्व धोक्यात आणले गेले आहे.ही वास्तविकता लोकशाहीला अपंगत्व आणणारी आहे.विरोधक त्यांचा आवाज लोकशाहीला अधिक बळकट करणारा असतो.हे सत्ताधारी सरकारने लक्षात घेणे गरजेचे आहे. विरोधी पक्ष फोडण्याचे मार्ग आणि कारणे: सत्तेचा गैरवापर, आर्थिक प्रलोभने व केंद्रीय तपास यंत्रणांचा धाक दाखवून विरोधी पक्षातील महत्त्वाच्या नेत्यांना सत्ताधारी पक्षात किंवा आघाडीत सामील करून घेतले जात आहे.विरोधी पक्षाचा आवाज दाबणे, विरोधकांना नामोहरम करणे आणि निवडणुकांशिवाय सत्ता हस्तगत करणे किंवा आपली ताकद वाढवणे, हा यामागील मुख्य हेतू असतो. लोकशाहीला धोका: जेव्हा सत्तेच्या बळावर विरोधी पक्ष फोडला जातो, तेव्हा मूळ लोकशाही धोक्यात येते. लोकशाहीत पहारेकऱ्याचा अभाव प्रकर्षाने जाणवतो: लोकशाहीचा खरा पहारेकरी असलेला विरोधी पक्षच कमकुवत झाल्यामुळे सरकारवर कोणाचाही अंकुश राहत नाही . राजकीय नेत्यांकडून अविश्वास आणि निराशा होणे: राजकीय नेत्यांच्या सततच्या आयाराम–गयाराम वृत्तीमुळे आणि सत्तेच्या लालसेमुळे सामान्य जनतेचा यांच्या राजकारणावरील आणि राजकीय नेत्यांवरील विश्वास उडतो. मुळ विचारधारांचा अंत: राजकीय फायद्यासाठी विरोधी पक्षातील नेते सत्तेत सामील होतात, तेव्हा त्यांची मूळ विचारसरणी आणि बांधिलकी नष्ट होऊन केवळ सोयीचे राजकारण उरते.त्यांच्या संधी साधुन वृत्तीचा व्यवस्थेवर परिणाम होतो. विकासावर होणारा विपरीत परिणाम: ज्यावेळी आमदार आणि खासदार फोडून सरकारे अस्थिर केली जातात किंवा नवीन सरकारे स्थापन केली जातात, तेव्हा संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा ही केवळ राजकीय तग धरून ठेवण्यात व्यस्त राहते.अशा अस्थिर राजकीय वातावरणात महागाई, बेरोजगारी, शेतीचे प्रश्न यांसारखे जनतेच्या जिव्हाळ्याचे विषय मागे पडतात. लोकशाहीत जनतेची भूमिका आणि उपाय: सत्तेच्या राजकारणासाठी विरोधी पक्ष फोडण्याच्या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी जनतेने जागरूक असणे अत्यंत गरजेचे आहे पक्षांतर बंदी कायद्यामध्ये अधिक कडक तरतुदी करून, आमदार किंवा खासदार फोडणाऱ्यांना लगेचच निवडणूक लढण्यास अपात्र ठरवले पाहिजे. सुजाण मतदारच आपल्या मताच्या माध्यमातून अशा अनैतिक राजकारणाला धडा शिकवू शकतात.संधीसाधु,भ्रष्ट, स्वताहाच्या स्वार्थीसाठी.पक्ष बदल करणारे यांना लोकशाहीत निवडणूकीत धडा शिकविण्यासाठी जनतेने जागरूक राहिले पाहिजे. लोकशाही व्यवस्थेतप्रत्येक राज्यात स्थानिक पक्ष व विरोधी पक्ष फोडणे हे तात्पुरत्या राजकीय फायद्याचे ठरू शकते; परंतु दूरगामी विचार करता हे लोकशाहीच्या मुळावर घाला घालणारे आहे. एक सशक्त आणि जबाबदार विरोधी पक्षच लोकशाही जिवंत ठेवू शकतो म्हणूनच, विरोधी पक्षांना फोडण्याचे धोरण थांबून लोकशाहीच्या निकोप वाढीसाठी सर्वपक्षीय नेत्यांनी राजकीय नीतिमत्ता पाळणे काळाची गरज आहे..



**डॉ.राजेंद्र मुरलीधर सानप**
संचालक –महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ
इंद्रप्रस्थ कॉलनी नगर रोड बीड
मो नं.९४२००१९५९७

# चकलांबा येथील वस्त्या आणि बालानाईक तांड्याला जोडणाऱ्या २० लाखाच्या पुलाच्या कामाला प्रारंभ





**बीड । प्रतिनिधी**

**गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील बाला नाईक या नवीन ग्रामपंचायतीचा दर्जा मिळालेल्या तांड्याला व चकलांबा येथील वस्त्याला जोडणाऱ्या पुलाला नुकतीच मंजुरी मिळाली आहे. सुमारे २० लाखाच्या पुल बांधकामास गुरुवारी प्रारंभ झाला आहे. चकलांबा आणि परिसरातील वस्तीच्या नागरिकांनी अनेक दिवसापासूनची मागणी होती. लोकप्रतिनिधींच्या पाठपुराव्यामुळे सदर कामाला मान्यता मिळाली आणि निधी मंजुर झाला आहे. सदरील कामाला मंजुरी मिळवून दिल्याबद्दल मंत्री, आमदार महोदय आणि सर्व संबंधित लोक प्रतिनिधींचे ऋण व्यक्त करण्यात आले आहे.**

चकलांबा गावच्या पश्चिम बाजूस नदीतील सांडव्यात पुल बांधण्यात यावा, अशी मागणी गेल्या अनेक वर्षापासून परिसरातील नागरिकांनी केली होती. त्यानुसार सुमारे २० लाखाच्या कामाला निधी मंजुरी मिळाली आहे. गेल्या दोन दिवसापूर्वी सदर कामाला सुरुवात झाली आहे. चकलांबा गावच्या पश्चिमेस असलेल्या वस्त्या आणि पश्चिम, नैऋत्येस असलेल्या बालानाईक तांड्याला सदर पूल झाल्यामुळे दळणवळण सुलभ होणार आहे. मंजूर अंदाजत्रकानुसार सदरील काम दर्जेदार व्हावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

# अकरावीच्या विद्यार्थ्यांना अर्ज दुरुस्तीची संधी

बीड । प्रतिनिधी

अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेदरम्यान अर्जात चुकीची माहिती भरल्यामुळे अनेक प्रवेश नाकारल्या गेलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण संचालनालयाने मोठा दिलासा दिला आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी त्यांना अर्जातील चुका दुरुस्त करण्याचा आणखी एक संधी देण्याचा निर्णय शिक्षण संचालनालयाने घेतला आहे. या संदर्भातील मार्गदर्शक सूचना राज्यातील सर्व विभागीय उपसंचालक, शिक्षणाअधिकारी, शिक्षण निरीक्षक आणि कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्यांना जाहीर करण्यात आल्या आहेत . नुकतीच अकरावी प्रवेश प्रक्रियेची पहिली फेरी पार पडली, मात्र या फेरी दरम्यान अनेक विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना तांत्रिक किंवा मानवी चुका केल्याचे समोर आले आहे. मूळ कागदपत्रा मधील तपशील आणि ऑनलाईन अर्जातील माहिती यामध्ये तफावत आढळल्याने महाविद्यालयांनी अशा विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारला.परिणामी, अनेक विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित राहावे लागले होते. याबाबत विद्यार्थी आणि पालकांकडून शिक्षण



विभागाकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. पालक आणि विद्यार्थ्यांच्या तक्रारीची दखल घेत माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने ही विशेष सुविधा उपलब्ध करून दिली आहे. पहिल्या फेरीत प्रवेश नाकारल्या गेलेल्या विद्यार्थ्यांना पुढील प्रवेश फेरी सुरू होण्यापूर्वी आपल्या अर्जातील चुकीची माहिती ऑनलाईन पद्धतीने दुरुस्त करता येणार आहे. पात्र विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे शिक्षण संचालनालयाने स्पष्ट केले आहे या निर्णयाची माहिती तळागाळातील विद्यार्थी आणि पालकांपर्यंत पोहोचून त्यांना योग्य मार्गदर्शन करण्याचे आदेश स्थानिक प्रशासनाला देण्यात आले आहेत.असे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक महेश पालकर यांनी सांगितले आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी याची दखल घेऊन पहिल्या फेरीत प्रवेश नाकारल्या गेलेल्या विद्यार्थ्यांना पुढील प्रवेश फेरी सुरू होण्यापूर्वी आपल्या अर्जातील चुकीची माहिती ऑनलाईन पद्धतीने दुरुस्त करावी असे आवाहन शिक्षण व करिअर कौन्सिलर डॉ. संजय तांदळे यांनी केले आहे.

## पान १ वरून...

### महाडीबीटी पोर्टलवर

यासाठी कृषी विभागाने महाडीबीटी पोर्टलवरून बियाणे वितरणाची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. यामुळे बियाणे वाटप प्रक्रियेत अधिक पारदर्शकता, सुलभता आणि वेग येणार आहे. शेतकऱ्यांनी कोणतीही प्रतीक्षा न करता महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करून या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही केले. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे पुढे म्हणाले, ‘‘खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण निविष्ठा उपलब्ध करून देणे ही शासनाची प्राथमिकता आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि डिजिटल व्यवस्थेच्या माध्यमातून कृषी सेवा थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घेऊन खरीप हंगामाची तयारी वेळेत पूर्ण करावी असेही यावेळी सांगितले. जास्तीत जास्त शेतकरी गटांनी पीक प्रात्यक्षिके या घटकाचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. प्रात्यक्षिके व बियाण्यांच्या अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी संबंधित विभागीय कृषी सहसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी अथवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

-----------------

### मराठा समाजाला ओबीसींप्रमाणे ८

व उच्च माध्यमिक वर्गातील विद्यार्थ्यांना लागू असलेली विशेष शिष्यवृत्ती योजना मराठा प्रवर्गासाठी विस्तारित करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना लागू असलेल्या इतर १६ बाबींबाबतच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती थेट शासनाकडून करण्याची योजना यात समाविष्ट आहे. महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असणारे, परंतु परराज्यात अनुदानित व विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या मराठा उमेदवारांना या योजनेचा लाभ घेता येईल. इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती आणि सोयी–सुविधा मिळण्यासाठी पात्र असलेल्या सर्व घटकांचा अभ्यास आता मराठा समाजासाठी खुला करण्यात आला आहे. सर्व मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी आता मराठा समाजातील विद्यार्थी पूर्णपणे पात्र धरले जातील. केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालयांमध्ये रिक्त राहिलेल्या जागांवर, प्रवेश नियंत्रण समितीने मान्यता दिलेल्या संस्थास्तरावरील जागांवर प्रवेश घेतलेल्या मराठा विद्यार्थ्यांनाही इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांप्रमाणेच सर्व शैक्षणिक सवलती लागू करण्यात येणार आहेत.

-------------

### काँग्रेस मविआतून बाहेर पडणार?

महाविकास आघाडीला बसणार,’’ असेही ते म्हणाले. पुणे शहरात शरद पवार गटाचे केवळ तीन नगरसेवक असतानाही त्यांनी व्यापक आघाडीच्या हिताचा विचार करायला हवा होता, असे मत व्यक्त करत मोरे यांनी नाराजी व्यक्त केली. ‘‘पुण्यात महाविकास आघाडीतून बाहेर पडावे, अशी भूमिका वरिष्ठ नेत्यांसमोर मांडली आहे,’’ असेही त्यांनी स्पष्ट केले. महाविकास आघाडी कायम राहणार की नाही, याचा अंतिम निर्णय वरिष्ठ नेतृत्व घेईल, असे सांगतानाच मोरे यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांमध्ये अंतर्गत समन्वय असल्याचा आरोप केला. घोडेबाजार झाला नाही, पण सेटलमेंट झाली आहे. प्रत्येक ठिकाणी भाऊबंदकीचे राजकारण सुरू राहिले तर महाविकास आघाडीचे मोठे नुकसान होईल, असा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, विधान परिषद निवडणुकीतील या घडामोडींमुळे महाविकास आघाडीतील अंतर्गत नाराजी उघडपणे समोर आली असून, आगामी काळात या वादावर वरिष्ठ नेते काय भूमिका घेतात, याकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

----------

### मान्सून महाराष्ट्राच्या वेशीवर!

केरळ आणि कर्नाटकमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडेल. बंगालच्या उपसागरातून दुसरी शाखा ईशान्य भारतातही जात आहे. त्या भागातही पढील सात दिवस मुसळधार पावसाची शक्यता आहे. पुढील २–३ दिवसांत नैऋत्य मान्सूनच्या पुढील वाटचालीस अनुकूल परिस्थिती असून, तो मध्य अरबी समुद्राचा काही भाग, कर्नाटक, महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश, गोवा, तामिळनाडू आणि नैऋत्य बंगालचा उपसागर, पश्चिम–मध्य, पूर्व–मध्य आणि ईशान्य बंगालच्या उपसागराचा आणखी काही भाग आणि ईशान्येकडील राज्यांच्या काही भागांमध्ये प्रवेश करेल.

-------------

### कॉकरोच जनता पार्टीचे आज

दिल्ली पोलीस आणि संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक प्रतिबंधात्मक व नियामक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्याची मागणी करण्यात आली होती. तसेच गर्दी नियंत्रणासाठी विशेष व्यवस्था करणे, इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळासह महत्त्वाच्या वाहतूक केंद्रांची सुरक्षा वाढवणे आणि आपत्कालीन सेवा व सार्वजनिक संस्थांचे कामकाज अबाधित राहील याची खात्री करण्याची विनंतीही करण्यात आली होती. याचिकाकर्त्या संस्थेने ४ जून रोजी दिल्ली पोलिस आयुक्तांना निवेदन देऊन आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक सुरक्षा आणि गर्दी व्यवस्थापन उपाययोजना करण्याची मागणी केली होती. मात्र, प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कार्ययोजना जाहीर करण्यात आलेली नसल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. दरम्यान, कॉकरोच जनता पार्टी ही सोशल मीडियावर उदयास आलेली एक उपरोधात्मक चळवळ आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांनी एका सुनावणीदरम्यान केलेल्या वक्तव्याच्या संदर्भातून या चळवळीची सुरुवात झाली. ऑनलाइन सक्रियतेच्या नावाखाली यंत्रणांवर टीका करणाऱ्या काही बेरोजगार तरुणांची तुलना कॉकरोचशी केल्याच्या वक्तव्याचा संदर्भ देत ही मोहीम सुरू करण्यात आली होती. नंतर सरन्यायाधीशांनी त्यांच्या वक्तव्याचा रोख बनावट पदव्या धारण करणाऱ्या व्यक्तींकडे असल्याचे स्पष्ट केले होते. अल्पावधीतच लाखो फॉलोअर्स मिळवणाऱ्या या चळवळीची विविध सोशल मीडिया खाती नंतर निलंबित करण्यात आली होती. तरीही ६ जून रोजी जंतरमंतर येथे आंदोलनाचे आवाहन करण्यात आल्याने त्याकडे प्रशासन आणि न्यायालयाचे लक्ष वेधले गेले आहे.

------------

### तणाव कायम : भारताकडून सिंधू

क्षमता आणि कराराच्या व्याख्येबाबत बेकायदेशीरपणे स्थापन करण्यात आलेल्या लवाद न्यायालयाने (१५ मे २०२६ रोजी दिलेला निर्णय भारताने फेटाळला आहे. नवी दिल्लीने (भारत) या न्यायालयाला कधीही मान्यता दिली नसून, त्याचे सर्व कामकाज आणि निर्णय अवैध मानले आहेत. माध्यमांशी बोलताना जैस्वाल यांनी स्पष्ट केले की, पाकिस्तानने सीमापार दहशतवादी कारवायांना दिलेला पाठिंबा विश्वासार्ह आणि कायमचा पूर्णपणे बंद करेपर्यंत हा करार पूर्ववत केला जाणार नाही. ‘‘पाकिस्तान पुरस्कृत सीमापार दहशतवादाला प्रत्युत्तर म्हणून सिंधू जल करार स्थगित ठेवण्यात आला आहे,‘‘ असे जैस्वाल यांनी सांगितले. चिनाब आणि बियास नद्यांवरील भारताच्या जलविद्युत प्रकल्पांबाबत इस्लामाबादने (पाकिस्तान) केलेल्या ताज्या टीकेला त्यांनी फेटाळून लावले. तुर्कीच्या परराष्ट्रमंत्र्यांच्या टिप्पणीबाबत विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना जैस्वाल यांनी स्पष्ट केले की, भारताचे आंतरराष्ट्रीय संबंध हे स्वतःच्या परराष्ट्र धोरणाच्या हितानुसार ठरतात. इतर देशांचे पाकिस्तानसोबत असलेल्या संबंधांबद्दलच्या चिंतेवर बोलताना जैस्वाल यांनी भारताच्या धोरणात्मक स्वायत्ततेचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, ‘‘आमच्या सर्व आंतरराष्ट्रीय संबंधांचे स्वतःचे स्वतंत्र स्थान आणि महत्त्व आहे.

-------------

### एमपीएससीच्या अंतिम निवडीत

राबविण्यात येणार आहे. स्पर्धा परीक्षांच्या अंतिम टप्प्यापर्यंत मजल मारलेल्या अनेक उमेदवारांकडे उच्च शैक्षणिक पात्रता, विश्लेषण क्षमता, नेतृत्वगुण आणि प्रशासकीय कौशल्ये असूनही मर्यादित पदसंख्येमुळे त्यांना संधी मिळत नाही. या गुणवंत मनुष्यबळाचा उपयोग राज्याच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासासाठी व्हावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. या योजनेअंतर्गत एमपीएससीच्या कोणत्याही परीक्षेतील मुलाखत, कौशल्य चाचणी किंवा शारीरिक चाचणी यासारख्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचलेल्या, मात्र अंतिम गुणवत्ता यादीत स्थान न मिळालेल्या उमेदवारांना लाभ मिळणार आहे. शासन निर्णयानंतर आयोजित होणाऱ्या सर्व परीक्षांसाठी हा उपक्रम लागू राहणार असून, मागील एका वर्षातील पात्र उमेदवारांची माहितीही त्यांच्या संमतीनंतर आणि तांत्रिकदृष्ट्या शक्य असल्यास पोर्टलवर समाविष्ट करण्यात येणार आहे. ‘निपुण सेतू’ पोर्टलवर उमेदवारांचे नाव, जन्मवर्ष, शैक्षणिक पात्रता, विशेष प्राविण्य, पूर्वानुभव, संबंधित परीक्षेचे नाव, अंतिम टप्प्यातील गुण तसेच संपर्क तपशील उपलब्ध असतील. मात्र संपर्क माहिती केवळ अधिकृत आणि पडताळणी झालेल्या नियोक्त्यांनाच पाहता येणार आहे. उमेदवारांची माहिती एमपीएससीच्या अंतिम निकालानंतर सुरक्षित एपीआय प्रणालीद्वारे स्वयंचलितपणे पोर्टलवर हस्तांतरित केली जाईल. यासाठी डिजिटल संमती अनिवार्य राहणार असून, उमेदवाराची आयोगाच्या अन्य कोणत्याही परीक्षेत निवड झाल्यानंतर त्याची माहिती पोर्टलवरून आपोआप हटविली जाईल. माहितीची गोपनीयता राखण्यासाठी एन्क्रिप्शन आणि ॲक्सेस कंट्रोलसारख्या तांत्रिक उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. शासनाने स्पष्ट केले आहे की, ‘मैत्री’ पोर्टल केवळ समन्वयकाची भूमिका बजावणार असून रोजगाराची कोणतीही कायदेशीर हमी देण्यात येणार नाही. नोकरीचे स्वरूप, वेतन आणि सेवाशर्ती या संबंधित नियोक्ता व उमेदवार यांच्यातील परस्पर करारावर आधारित असतील. ‘मैत्री २.०’ अंतर्गत ‘निपुण सेतू’ पोर्टल पुढील दोन महिन्यांत कार्यान्वित करण्यात येणार आहे. उपक्रमाच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव अथवा प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून विकास आयुक्त (उद्योग) हे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत. ही समिती त्रैमासिक आढावा घेऊन पोर्टलच्या प्रभावी वापरासाठी शासकीय व खासगी संस्थांना प्रोत्साहन देणार आहे. या उपक्रमामुळे एमपीएससीच्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचलेल्या हजारो गुणवंत उमेदवारांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होणार असून राज्याला कुशल मनुष्यबळाचा लाभ मिळणार आहे. यासंदर्भातील शासन निर्णय उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने ५ जून २०२६ रोजी निर्गमित केला आहे.

--------------

### पवार फुल राजकारण! लखानी

विशेष म्हणजे ज्या काळी लखानी ग्रामीण भागातील सर्वसामान्यांचा उन्हातान्हातील आधार होता त्याच काळामध्ये पॅरागॉन देखील ब्रँड होता. त्याचे देखील मोठे नाव झाले होते, पण आता हे पॅरागॉन कोण आहेत हे कोणालाही माहीत नाही. विशेष म्हणजे आजच्या पिढीला देखील ते माहित नसावेत. पण जुन्या काळात लखानी सोबतच पॅरागॉन हा आवडता ब्रँड होता. पवारांच्या पावरमुळे लखानी ब्रँड आता सभागृहात गेला आहे. पण मग सर्वसामान्यांच्या मनात असलेला पॅरागॉन कुठे आहे ? असा प्रश्न काहींच्या मनात येऊ येणे साहजीकच आहे.


---------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार, दि. ०६ जून २०२६
३

## थोडक्यात

### राजेश बाभूळगावकर यांचे निधन

बीड । प्रतिनिधी



शहरातील धोंडीपुरा भागातील रहिवासी व वृत्तपत्र विक्रेते राजेश जीवनराव बाभूळगावकर (वय ५१) यांचे गुरुवारी (ता. चार) रात्री निधन झाले. त्यांच्यावर छत्रपती संभाजी नगर मधील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, भाऊ असा परिवार शुक्रवारी सकाळी त्यांच्यावर बीड येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

### सरपंच हिराभाऊ केरूळकर यांना पितृशोक

आष्टी । प्रतिनिधी



आष्टी तालुक्यातील तवलवाडी गावातील धार्मिक, सामाजिक आणि आध्यात्मिक कार्यात नेहमीच हिरिरीने सहभागी होणारे, प्रेमळ स्वभावाचे ज्येष्ठ नागरिक तथा जुन्या पिढीतील मान्यवर व्यक्तिमत्त्व सोपानराव केरूळकर यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. ते तवलवाडीचे सरपंच हिराभाऊ केरूळकर यांचे वडील होत. सोपानराव केरूळकर हे गावातील धार्मिक व सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणारे व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. विठ्ठलभक्तीची नाळ जपणारे आणि नित्यनेमाने पंढरपूरची वारी करणारे वारकरी म्हणून त्यांची विशेष ओळख होती. त्यांच्या साध्या, मनमिळावू आणि समाजाभिमुख स्वभावामुळे त्यांनी गावकऱ्यांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले होते.

त्यांच्यावर शुक्रवारी सकाळी १० वाजता तवलवाडी येथील केरूळकर वस्तीवर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नेते देविदास आबा धस, उद्धव बापू दरेकर डॉक्टर मधुकर हंबर्डे गणेश नाना शिंदे, आदी सह विविध क्षेत्रातील मान्यवर, डॉक्टर, वकील, मित्रपरिवार, नातेवाईक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात मुलगे, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. सोपानराव केरूळकर यांच्या निधनामुळे केरूळकर परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, सरपंच हिराभाऊ केरूळकर यांच्यासह संपूर्ण कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे. ईश्वर दिवंगत आत्म्यास चिरशांती देवो आणि केरूळकर परिवाराला या दुःखातून सावरण्याची शक्ती प्रदान करो, हीच भावपूर्ण श्रद्धांजली.

### जिल्हा परिषद मुख्यालयात शिवस्वराज्य दिनाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराजांच्या दैदिप्यमान राज्य कारभाराच्या आणि सार्वभौमत्वाच्या प्रेरणेचा उत्सव असलेला शिवस्वराज्य दिन शनिवार दि. ६ जून २०२६ रोजी बीड जिल्हा परिषद मुख्यालयात अत्यंत उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. तरी सर्वांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषद कार्यालयामध्ये हा दिवस साजरा केला जातो. बीड जिल्हा परिषदेत सकाळी ठीक ९ वाजता बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री यांच्या शुभहस्ते आणि अध्यक्षतेखाली हा मुख्य सोहळा संपन्न होणार आहे. शासकीय मार्गदर्शक सूचनेनुसार, शनिवार दि. ६ जून रोजी जिल्हा परिषद परिसरात भगव्या स्वराज्य ध्वजासह शिवशक राजदंड आणि स्वराज्यगुढी उभारण्यात येणार आहे. यावेळी स्वराज्य ध्वजास मानवंदना व अभिवादन केले जाईल. हा भव्य सोहळा जिल्हा परिषदेचे सर्व माजी पदाधिकारी, सर्व विभागांचे खातेप्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थितीत पार पडणार आहे. असेही कळविले आहे.


# अबब.. ऐकावे ते नवलचं! वडवणी प्राथमिक आरोग्य केंद्राने पाच वर्षांपासून बालकांच्या जन्मनोंदीचा डाटा दिलाच नाही

**शेकडो बालके शिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ; दोषींवर कठोर कारवाई करावी अन्यथा आंदोलन – भारत जगताप**

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात सन २०१९ ते २०२५ या कालावधीत जन्मलेल्या शेकडो मुला-मुलींच्या जन्माची नोंद आरोग्य केंद्राच्या ऑफलाईन अभिलेखांमध्ये उपलब्ध असतांनाही संबंधित जन्मनोंदींचा डाटा नगरपंचायत प्रशासनाकडे पाठविण्यात आल्या नसल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. परिणामी या बालकांची अधिकृत जन्मनोंद झालेली नसून त्यांना जन्म प्रमाणपत्र मिळू शकलेले नाही. यामुळे आता शालेय प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करतांना पालकांसमोर मोठी अडचण निर्माण झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कालावधीत वडवणी प्राथमिक आरोग्य केंद्रात जन्मलेल्या अनेक बालकांची माहिती नगरपंचायतीकडे पाठविण्यात आली नसल्याने त्यांची ऑनलाईन जन्मनोंदच झालेली नाही. यातील काही बालके आता सहा वर्षांची झाल्याने त्यांचा शाळेत प्रवेश घेण्याची वेळ आली आहे. मात्र प्रवेशासाठी आवश्यक असलेले जन्म प्रमाणपत्र अथवा ऑनलाइन जन्मनोंदीचा पुरावा उपलब्ध नसल्याने पालकांना आधार कार्ड काढताना आणि शालेय प्रवेश प्रक्रिया पूर्ण करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या प्रकरणी आरोग्य विभागाने वडवणी तहसील प्रशासनाकडे सन २०१९ ते २०२५ या कालावधीतील सुमारे २०० जन्मनोंदी नोंदविण्यासंदर्भात आवश्यक आदेश देण्याची विनंती केली आहे. तथापी, अद्याप तहसील प्रशासनाकडून याबाबत कोणताही ठोस निर्णय अथवा आदेश जारी करण्यात आलेला नसल्याचे समजते. त्यामुळे संबंधित बालकांचे पालक चिंतेत असून प्रशासनाच्या दिरंगाईचा फटका त्यांना बसत आहे. या संपूर्ण प्रकरणात आरोग्य विभागाच्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची गंभीर निष्काळजीपणा आणि कर्तव्यातील कुचराई स्पष्टपणे दिसून येत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात जन्मनोंदी प्रलंबित राहणे ही अत्यंत गंभीर बाब असून यासाठी जबाबदार असलेल्या सन २०१९ ते २०२५ या कालावधीतील आरोग्य प्रशासनातील सर्व संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर वरिष्ठ प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरु लागली आहे. याबाबत प्रतिक्रिया देतांना वडवणी येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते तथा रोजगार हमी योजनेचे माजी अध्यक्ष भारत दादा जगताप यांनी सांगितले की, आमच्याकडे लोकप्रतिनिधी या नात्याने शेकडो पालक दररोज यासाठी चकरा मारत आहेत. ते प्रचंड त्रस्त झालेले आहेत. आरोग्य विभागाच्या निष्काळजीपणामुळे शेकडो बालकांचे भविष्य धोक्यात आले आहे. पुढील आठवड्यात नविन शैक्षणिक वर्ष सुरु होवून शाळाही सुरु होणार आहेत. त्यामुळे प्रशासनाने तातडीने सर्व जन्मनोंदी पूर्ण करुन पालकांना दिलासा द्यावा. अन्यथा सर्व प्रभावित बालके व त्यांच्या पालकांना सोबत घेवून लवकरच व्यापक जनआंदोलन छेडण्यात येईल. दरम्यान, वडवणी आरोग्य विभाग आणि तहसील प्रशासनातील समन्वयाच्या अभावामुळे तालुक्यातील शेकडो विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. प्रशासनाने या प्रकरणाचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन सर्व प्रलंबित जन्मनोंदी तात्काळ पूर्ण करण्याचे आदेश द्यावेत, तसेच या चिमुकल्या बालकांच्या शिक्षणाच्या प्रवासात निर्माण झालेला अडथळा दूर करुन त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सकारात्मक पाऊल उचलावे, अशीही मागणी भारत दादा जगताप तसेच पालक व नागरिकांकडून करण्यात येत आहे.



## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बीड जिल्ह्यात भाजयुमोचा भव्य वृक्षलागवड उपक्रम

वडवणी । प्रतिनिधी

पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांच्या आवाहनानुसार व जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा, बीड जिल्ह्याच्या वतीने गुरुवार, दि. ५ जून २०२६ रोजी जिल्ह्यातील प्रत्येक मंडळांत विविध भव्य वृक्षलागवड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. एक झाड, एक जीवन या संकल्पनेवर आधारित हा उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात येणार असून पर्यावरण संरक्षणासाठी जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांच्या आवाहनानुसार, भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक तसेच माजी खासदार प्रीतमताई मुंडे यांच्या सूचनेनुसार आणि भाजयुमो बीड जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांच्या





मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम गुरुवार दि. ५ जुन रोजी आयोजित करण्यात आला आहे. बीड जिल्ह्यातील प्रत्येक मंडळांत ५०० झाडे लावण्यात येणार आहेत. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि कमी होत चाललेले हरित क्षेत्र यामुळे पर्यावरण संरक्षणाची गरज अधिक तीव्र झाली असून त्याच पार्श्वभूमीवर हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या वृक्षलागवड कार्यक्रमात विविध प्रकारच्या सावली, फळे व औषधी गुणधर्म असलेल्या वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. लावण्यात येणाऱ्या वृक्षांचे संगोपन आणि संवर्धन करण्याचाही संकल्प यावेळी करण्यात येणार आहे. केवळ वृक्षलागवड न करता त्यांचे संवर्धन करण्यावर विशेष भर देण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असून प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसरात किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे, असा संदेश या उपक्रमातून दिला जाणार आहे. वृक्षांमुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होते, तसेच भविष्यातील पिढ्यांसाठी स्वच्छ आणि निरोगी वातावरण निर्माण होण्यास हातभार लागतो. त्यामुळे सामाजिक बांधिलकी जपत या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास भारतीय जनता पक्ष, भारतीय जनता युवा मोर्चाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी तसेच पर्यावरणप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून वृक्षलागवड अभियान यशस्वी करावे, असे आवाहन भारतीय जनता युवा मोर्चा बीड जिल्ह्याचे वतीने करण्यात आले आहे.

पान ६ वरुन...

### शॉर्टसर्किटने होके

घरातील साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने होके कुटुंबावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले.अनिकेत रांजवण,दत्ता होके, निलेश होके, स्वप्नील नागरिक व अग्निशमन दलाच्या मदतीने आग आटोक्यात.कोणतीही जीवितहानी नाही.प्रशासनाकडून मदतीची मागणी करण्यात आली आहे.

### बायपासवरील उड्डाणपूल व

आहेत. तसेच १२ किलोमीटर लांबीच्या बायपास मार्गावर उर्वरित भागातही ५.५ मीटर रुंदीचा सर्व्हिस रोड मंजूर करण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याचे आदेश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.बीडकरांच्या सुरक्षिततेसाठी आणि विकासासाठी जनतेच्या हक्काचा संघर्ष कायम ठेवणार असल्याचे आ.क्षीरसागर यांनी यावेळी सांगितले.

छत्रपती संभाजी महाराज स्मारकाचे वैभव अबाधित राहणार; पुलापेक्षा स्मारकाची उंची अधिक ठेवण्याचे निर्देश

महालक्ष्मी चौक येथील स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज स्मारक परिसर हा बीड शहराच्या अस्मितेशी जोडलेला आहे. या परिसरातूनच उड्डाणपूल जाणार असल्याने, स्मारकाच्या गौरवाला आणि वैभवाला कोणत्याही प्रकारे बाधा पोहोचू नये, अशा विशेष सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मारकाची उंची ही उड्डाणपुलापेक्षा अधिक असावी, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याची सूचना त्यांनी केल्या आहेत. विकासकामे महत्त्वाची असली, तरी इतिहास, संस्कृती आणि प्रेरणास्थानांचे जतन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी असून बीडच्या गौरवशाली वारशाच्या संवर्धनासाठी आपण कटिबद्ध असल्याचे आ.क्षीरसागर यांनी स्पष्ट केले आहे.

### आष्टी,पाटोदा व शिरूर कासार

वारणी को.प.ब. क्र. १,कालापुरी (सीना) को.प.ब.,पाडळी को.प.ब. क्र. १,मानूर को.प.ब. क्र. १,मानूर को.प.ब. क्र. २,मानूर को.प.ब. क्र. ३,मानूर सीना बंधारा,रायमोह-नाळवंडी को.प.ब. क्र. १ या कामांसाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, कार्यकारी अभियंता लंब्बा, नाम फाउंडेशनचे मराठवाडा समन्वयक राजाभाऊ शेळके, उपअभियंता किरण उदमले तसेच संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे ही कामे वेळेत सुरू झाली असून शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करत आमदार सुरेश धस यांचे आभार मानले आहेत.'बंधाऱ्यांची दुरुस्ती, नदी खोलीकरण व भराव बांधकामामुळे सिंचन क्षमता वाढणार असून आगामी काळात हजारो एकर शेतीला याचा लाभ होणार आहे,'' अशी भावना परिसरातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

भीमराव आंबेडकर व आनंदराज आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत

## उपवर्गीकरणविरोधी संघर्ष परिषदेसाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे –पुरुषोत्तम वीर

बीड । प्रतिनिधी

सामाजिक न्याय, संविधानिक हक्क आणि बहुजन समाजाच्या एकतेच्या प्रश्नावर आयोजित करण्यात आलेल्या उपवर्गीकरणविरोधी संघर्ष परिषद या महत्त्वपूर्ण परिषदेस बहुजन समाजातील नागरिकांनी हजारोंच्या संख्येने मराठवाड्यातील जनतेने उपस्थित राहावे, असे आवाहन रिपब्लिकन सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम (गोटू) वीर यांनी केले आहे.



ही परिषद दि. ०७ जून २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता तापडिया नाट्य मंदिर, निराला बाजार, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेला भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आदरणीय डॉ. भिमराव यशवंतराव आंबेडकर तसेच रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. देशभरात अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरणाचा मुद्दा चर्चेत असताना बहुजन समाजाच्या हक्कांवर गदा येऊ नये आणि संविधानिक अधिकारांचे संरक्षण व्हावे, या उद्देशाने या संघर्ष परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत उपवर्गीकरणाच्या परिणामांवर सखोल चर्चा होणार असून समाजाच्या भविष्यासंदर्भात महत्त्वपूर्ण दिशा ठरविण्यात येणार आहे. यावेळी डॉ. भिमराव आंबेडकर आणि सरसेनानी आनंदराज आंबेडकर हे समाजबांधवांना मार्गदर्शन करणार असून सामाजिक, राजकीय आणि संविधानिक प्रश्नांवर आपली भूमिका मांडणार आहेत. त्यामुळे बहुजन समाजातील युवक, विद्यार्थी, महिला, कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून परिषद यशस्वी करावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. शिका, संघटित व्हा, संघर्ष करा या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना केंद्रस्थानी ठेवून आयोजित करण्यात आलेली ही परिषद बहुजन समाजाच्या एकजुटीचे प्रतीक ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.उपवर्गीकरण होऊ देणार नाही.

## पै.सुमितकुमार भारस्कर यांची आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

माजलगाव । प्रतिनिधी

थायलंड येथे २० वर्षाखालील आशियाई चॅम्पियनशिप कुस्ती स्पर्धा दिनांक - २६ जून ते ५ जुलै २०२६ या कालावधीत होणार आहे.या स्पर्धेसाठी राष्ट्रीय संघाची निवड चाचणीचे आयोजन भारतीय कुस्ती महासंघ यांच्या वतीने, भारतीय खेल प्राधिकरण (एस.ए.आय.) प्रशिक्षण केंद्र लखनऊ - उत्तर प्रदेश येथे, दिनांक २ जून २०२६ रोजी करण्यात आले.या निवड चाचणी स्पर्धेत पै.अमोल बुचडे कुस्ती अकादमी मारुंजी चे खेळाडू पै. सुमितकुमार भारस्कर यांनी ७० किलो वजनगट, फ्रीस्टाइल प्रकारामध्ये सहभागी होवून आपली जागा निश्चित केली आहे.



पै. सुमितकुमारने प्रथम फेरीत उत्तर प्रदेश मधील रवी कुंतल याच्यावर ३ विरुद्ध ९ अशा गुण फरकाने विजय मिळवला.अंतिम फेरीमध्ये सुमितकुमार व नरेंद्र हरियाणा यांच्यामध्ये लढत झाली.या लढतीत सुमितकुमार ७ विरुद्ध १ अशा गुणांच्या फरकाने विजयी झाला,या विजयाबरोबर सुमितकुमारने भारतीय संघामध्ये आपले स्थान नक्की केले आहे. पै. सुमितकुमार हा खेळाडू अमोल बुचडे कुस्ती अकादमी मध्ये मागील सहा वर्षापासून सराव करत आहे. महाराष्ट्र केसरी,रुस्तम-ए-हिंद,पै.अमोल (भाऊ) बुचडे यांच्या शिकवणीतून हा गुणवान खेळाडू तयार होत आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या तयारीसाठी सराव शिबिराचे आयोजन अखिल भारतीय कुस्ती महासंघाच्या वतीने भारतीय खेळ प्राधिकरण साई यांच्या प्रशिक्षण केंद्रात लखनऊ येथे सुरू आहे. हा खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्तम कामगिरी करील, व पहिल्याच प्रयत्नात आंतरराष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र राज्य व देशासाठी पदक मिळवण्याचा त्याचा १००% प्रयत्न राहील, असे मत वस्ताद पै. अमोल (भाऊ) बुचडे यांनी व्यक्त केले. पै. सुमितकुमार यांची आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल त्याचे व कुटुंबाचे, वस्ताद, प्रशिक्षकांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.तसेच, पै.अमोल बुचडे, प्रा.किसन बुचडे, पै.विनोद गोरे, पै.समीर देसाई, पै.उत्कर्ष काळे, कोच नरेंद्र कुमार, अनिराज सुभेदार, हितेंद्र कांबळे, पो.नि.मिलिंद झोडगे,प्रा महेश घुले,प्रा संतोष पवार यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## मोफत आरोग्य शिबिराचे उत्साहात उद्घाटन

पाटोदा । प्रतिनिधी

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर (जि. नाशिक) संचलित सद्गुरु प.पू. मोरेदादा चॅरिटेबल हॉस्पिटल अँड मेडिकल ट्रस्ट अंतर्गत पाटोदा येथे आज भव्य 'मोफत आरोग्य तपासणी, नाडी परीक्षण व सर्व रोगनिदान शिबिराचा' शुभारंभ अत्यंत उत्साहात झाला. सकाळी ठीक १०:०० वाजता उद्घाटनाचा मुख्य कार्यक्रम संपन्न झाला.पोलीस निरीक्षक कस्तुरे साहेबांच्या हस्ते उद्घाटनकार्यक्रमाची सुरुवात अत्यंत भक्तीमय वातावरणात झाली. पाटोदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक (पीआय) कस्तुरे साहेब यांच्या हस्ते गुरुपीठाच्या व प्रतिमेची आरती करण्यात आली. आरती संपन्न झाल्यानंतर कस्तुरे साहेबांच्या हस्ते फित कापून या भव्य आरोग्य



शिबिराचे अधिकृत उद्घाटन करण्यात आले.मान्यवरांची प्रमुख उपस्थितीया उद्घाटन सोहळ्याला पाटोदा शहरातील अनेक राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील प्रमुख व्यक्तींनी हजेरी लावली होती. यामध्ये प्रामुख्याने:राजू जाधव (नगराध्यक्ष, पाटोदा)कस्तुरे साहेब (पोलीस निरीक्षक, पाटोदा पोलीस स्टेशन)नयूम पठाण माजी मुख्याध्यापक जाधव सर (नगरसेवक)ढाकणे साहेब (एसटी ड्रायव्हर)श्रीकांत दसेविजय अंदुरेशहरातील प्रमुख डॉक्टर मंडळी आणि स्वामी सेवक.पत्रकार बांधवांची विशेष उपस्थितीया सामाजिक उपक्रमाला प्रसिद्धी देण्यासाठी आणि पाठबळ देण्यासाठी क्षेत्रातील ज्येष्ठ पत्रकार पोपट कोल्हे, पत्रकार हमीद पठाण आणि पत्रकार सतीश गर्जे यांची कार्यक्रमास प्रामुख्याने उपस्थिती होती. नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसादशिबिराचे आयोजन श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, क्रांतिनगर, पाटोदा येथे करण्यात आले आहे. उद्घाटन प्रसंगी पाटोदा शहर व परिसरातील पुरुष तसेच महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. तपासणीसाठी नागरिकांनी सकाळी नऊ वाजेपासूनच केंद्रावर गर्दी केली होती.विविध आजारांवर मोफत निदानया शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमद्वारे हृदयविकार, मधुमेह (डायबिटीज), रक्तदाब, सर्व प्रकारचे कॅन्सर, सांध्यांचे विकार, त्वचा रोग, पोटाचे विकार, महिलांचे आजार, मुतखडा, मुळव्याध आणि लहान मुलांचे आजार यांवर मोफत नाडी परीक्षण व औषधोपचार मार्गदर्शन केले जात आहे. गुरुमाउली प.पू. आण्णासाहेब मोरे यांच्या प्रेरणेने आयोजित या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. श्री स्वामी समर्थ दिंडोरी प्रणित गुरुपीठ चे डॉक्टर गोरकर यांनी मार्गदर्शन केले एकूण दिवसभरात १०० तपासणीचा लाभ घेतला.

पान ६ वरुन...

### अपघाती मृत्यूचा बनाव

मोबाईल कॉल डिटेल रेकॉर्ड आणि लोकेशन विश्लेषण,सीसीटीव्ही फुटेजची तपासणी,साक्षीदारांचे जबाब आणि गोपनीय बातमीदारांकडून मिळालेली माहिती,या सखोल तपासानंतर हा मृत्यू अपघाती नसून खूनच असल्याचे निष्पन्न झाले.

गुन्हा उघडकीस येत असल्याचे समजताच आरोपी फरार झाले होते. त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांची विशेष पथके रवाना करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखा बीड, तळोजा पोलीस स्टेशन (पनवेल) चे सपोनि निलेश येवले व त्यांचे पथक, आणि टेक्निकल सेलचे विकी सुरवसे यांच्या संयुक्त सहकार्याने आरोपींचा माग काढण्यात आला. अखेर पोलिसांनी तळोजा परिसरातून आरोपींना ताब्यात घेऊन जेरबंद केले.

कोणताही सुगावा नसताना अवघ्या ७२ तासांत या गुंतागुंतीच्या खुनाचा पर्दाफाश केल्याबद्दल नेकनूर पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे. ही धडक कारवाई नेकनूर पोलीस स्टेशनचे प्रभारी व तपास अधिकारी सपोनि मंगेश साळवे यांच्या नेतृत्वाखाली सफौ संजय गुंड, पोह/दत्ता बळवंत, विशाल क्षीरसागर, मन्सूर शेख, गणेश परजने, बाबासाहेब साळुंखे, पोशिं बालाजी ढाकणे आणि सुधाकर जायभाये यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

### घरात घुसून प्राणघातक

चव्हाण, नवनाथ शिवाजी राठोड आणि रविंद्र किसन आडे या ११ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता अंतर्गत विविध कलमान्वये वसंत भाऊराव राठोड यांच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.जखमींच्या वैद्यकीय अहवाल व जबाबांच्या आधारे हा गुन्हा नोंदविण्यात आला असून आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नाही. सदरील प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संदीप राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.


### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचीत करण्यात येते की, आमचे पक्षकार अविनाश बळीराम भोरे व उमेश अर्जुन लोहकरे यांनी दिलेल्या अधिकार व सुचने वरुन खालील आशयाचे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

आमचे पक्षकार यांची मौजे मसई ता. अंबड जि. जालना येथील जमीन गट नंबर १२६ क्षेत्र २ हे२६ आर पो. ख. ०० हे. ०३ आर एकुण क्षेत्र २ हे. २९ आर आकार ३ रुपये ५० पैसे पैकी अमोल प्रकाश राठोड व मिराबाई प्रकाश राठोड यांची मालकी व ताब्यातील ०० हे. २० आर संपूर्ण जमीन तसेच भागुबाई गोपीचंद राठोड यांच्या मालकी व ताब्याची १ हे. २१ आर जमीनीपैकी ०० हे. २१ आर जमीन ज्याची चतुःसिमा पुर्वेस :-नखुबाई गुलाब चव्हाण यांची जमीन, पश्चिमेस रस्ता, दक्षिणेस : राम चंदू पवार यांची जमीन, उत्तरेस : कैलास भाऊ राठोड यांची जमीन या वरील चतुः सिमेच्या आतील जमीन मुळ मालक यांनी निर्विवाद व निर्जोखमीच्या तसेच त्यांच्या मालकी व ताब्यातील असल्याचे सांगितले आहे व सदर जमीन ही माझे पक्षकार यांनी खरेदी करण्याचा करार संजय बाबासाहेब विधाटे यांचेसोबत झालेला आहे. करीता या जाहीर प्रगटनाद्वारे सुचीत करण्यात येते की, वरील चतुः सिमेच्या आतील मिळकतीबाबत कुणाचा काही खरेदी-विक्री, बक्षीस, तारण, चोळीबांगडी बाबत तसेच, शासकीय, निमशासकिय, खाजगी कर्ज बोजा, तसेच सहकारी, सोसायटी, पतसंस्था यांचे कर्जा बाबत तसेच वारस यांचे हक्क व अन्य काही आक्षेप असेल तर त्यांनी सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसाचे आत लेखी आक्षेप आमचे कार्यालयास कळवावा. मुदतीनंतर आलेला आक्षेप विचारात न घेता आमचे पक्षकार सदर जमीनी बाबत कायम खरेदीखत लिहून देणार यांचेकडून करुन घेतील व मुदतीनंतर आलेला कोणताही आक्षेप आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही करीता हे जाहीर प्रगटन.

दिनांक : ०५/०६/२०२६

मार्फत
अॅड एल. ए. गायके
अतिरिक्त जिल्हा व सत्र
न्यायालय, अंबड
जि. जालना

जाहीर प्रगटन देणार
अविनाश बळीराम भोरे
उमेश अर्जुन लोहकरे





# शक्तिपीठ महामार्गाच्या सर्व्हेक्षणाला विरोध, माळशिरस तालुक्यातील शेतकरी आक्रमक

सोलापूर / प्रतिनिधी

शक्तिपीठ महामार्गाविरोधात शेतकरी आक्रमक झाले आहेत. सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील निमगाव येथील शेतकऱ्यांनी प्रस्तावित महामार्गाच्या सर्व्हेक्षणाला जोरदार विरोध दर्शवला आहे. यामुळे येथे तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे.

निमगाव परिसरातील सुमारे ३०० एकर बागायती जमीन या महामार्ग प्रकल्पात जाणार असल्याचे सांगितले जात आहे. येथील बहुतांश शेती क्षेत्र सिंचनाखाली आहे. पण, महामार्ग बागायती क्षेत्रातून जात असल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत. यामुळे प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून पोलिसांनी गुरुवारी (दि. ४ जून) पहाटे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माळशिरसचे तालुका अजित बोरकर तसेच के. के. पाटील यांना त्यांच्या घरात जाऊन ताब्यात घेतले. हे दोघे स्वतः शेतकरी आहेत. पोलिसांच्या या कृतीचा शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी निषेध केला आहे. राजू शेट्टी यांनी दिलेल्या माहितीनुसार, आज माळशिरस तालुक्यात शक्तिपीठ महामार्गाच्या सर्व्हेक्षणासाठी प्रांत, तहसिलदार आणि भूमी अभिलेख विभागाचे अधिकारी येणार होते.



माळशिरस तालुक्यात शक्तिपीठ महामार्गास कडाडून विरोध होऊ लागला आहे. यामुळे पोलिसांनी आज सकाळी पहाटेच शेतकऱ्यांना अंथरूणातून उठवून त्यांना ताब्यात घेत अकलूज पोलिस ठाण्यात नेले.

पोलिस शेतकऱ्यांवर दादागिरीची भाषा करत असून ते जनरल डायर याच्याप्रमाणे वागू लागल्याचा आरोप शेट्टी यांनी केला आहे. शेतकऱ्यांना फरफटत नेऊन ताब्यात घेतले जात असताना शेतकऱ्यांच्या मतांवर निवडून आलेले लोकप्रतिनिधी रस्त्यावर का उतरत नाहीत? असा संतप्त सवाल त्यांनी केला. या महामार्गाला विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांना फरफटत ओढून नेले जात असल्याचा एक व्हिडिओदेखील शेट्टी यांनी समाजमाध्यमावर पोस्ट केला आहे.

अधिकाऱ्यांना माघारी फिरावं लागलं...

संत सावता माळी यांची कर्मभूमी आणि जन्मभूमी असलेल्या अरण गावातूनही शक्तिपीठ महामार्गास जोरदार विरोध सुरु आहे. या गावातील शक्तिपीठ महामार्गात जवळपास ६०० एकर जमीन जाणार आहे. या गावातून पालखी महामार्ग व पुणे -सोलापूर राष्ट्रीय महामार्ग अस्तित्वात असून, येथील शेतकऱ्यांनी आता प्रस्तावित महामार्गाला कडाडून विरोध केला आहे. यामुळे प्रांत, तहसीलदार, पोलिस अधिकारी यांना सर्वेक्षण न करता माघारी जावे लागल्याचे शेट्टी यांनी सांगितले.

# शेळ्यांचे जंत निर्मुलन व आरोग्य व्यवस्थापन



शेळीला गरीबाची गाय असे संबोधले जाते. शेळी ही रोगाला फारशी बळी पडत नाही, परंतु विशेषतः पावसाळ्यात शेळीची विशेष काळजी घ्यावी लागते. त्याकरिता वेळेवर लसीकरण करणे, नियमित जंत निर्मुलन, गोठ्याची स्वच्छता, गव्हाणीचा वापर या बाबींचा आरोग्यावर निश्चित परिणाम होतो. शेळ्यांची सदृढ पचनसंस्था व आरोग्यासाठी जंत निर्मुलन करून घेऊन खालीलप्रमाणे जंतनाशक औषधांचा वापर करावा. करडांच्या वयाच्या २० ते ३० दिवसापासून जंतनाशक औषधे देता येतात.

जानेवारी व जुलै : अल्बेन्डाझॉल १० मि.ग्रॅ. प्रति किलो वजनाप्रमाणे चपटेकृमी व गोलकृमी जंतांच्या निर्मुलनासाठी वापरावे.

एप्रिल व ऑक्टोबर : डोस्टोडीन किंवा झोनील पैकी कोणतेही एक औषध यकृत कृमीच्या निर्मुलनासाठी १० मि.ग्रॅ. प्रतिकिलो वजनाप्रमाणे वापरावे.

लाळ्याखुरकत : हा विषाणूजन्य रोग आहे. या रोगाच्या प्रमुख लक्षणामध्ये शेळ्यांच्या जिभेवर तोंडात, पायात, कासेवर आणि तोंडाच्या आतील भागावार फोड येतात. तोंडातून जास्त प्रमाणात लाळ पडते.

उपचार व प्रतिबंध : या रोगामुळे शेळ्यांचे खाणे-पिणे कमी होते. त्यामुळे शेळ्या कमजोर होतात. त्याकरिता त्यांना पाण्यातून जीवनसत्त्वे द्यावेत. जिभेचे फोड अन्टीसेप्टीक औषध लावून धुवावे. प्रतिबंधात्मक उपचाराकरिता वर्षातून दोन वेळा लस टोचून घ्यावे. (१ मि.ली.) वरीलप्रमाणे शेळ्यांचे व्यवस्थापन केल्यास शेतकऱ्यांना शेळीपालन एक किफायतशीर व्यवसाय फायद्याचा ठरेल व शेळीपालकांचा आर्थिक स्तर उंचावेल.

# तूर लागवडीसाठी निवडा योग्य वाण

कडधान्य पिकांपैकी महत्त्वाचे पीक म्हणून तूर पीक ओळखले जाते. तूर लागवडीसाठी जमिनीच्या प्रकारानुसार आणि पर्जन्यमानानुसार तसेच पीक पद्धतीनुसार योग्य वाणाची निवड महत्त्वाची ठरते. या वर्षीच्या पावसाच्या स्थितीचा विचार करून कमी कालावधीत परिपक्व होणाऱ्या शिफारशीत वाणांची निवड करून लागवड करण्यास प्राधान्य द्यावे.

मध्यम जमीन आणि मध्यम पर्जन्यमान : आयपीए १५-०६, एकेटी ८८११, आयसीपीएल ८७ (प्रगती), राजेश्वरी, गोदावरी, रेणुका, फुले तृप्ती. लवकर तयार होणारे वाण.

मध्यम कालावधीचे वाण : पीकेव्ही तारा, विपुला, बीएसएमआर ७८६, बीएसएमआर ८५३, बीडीएन ७०८, बीडीएन ७१६, पीडीकेव्ही आश्लेषा.

उशिरा तयार होणारे वाण : आशा, आयसीपीएल ८७११९ किंवा पीडीकेव्ही आश्लेषा.

लवकर तयार होणारे वाण : आयपीए १५-०६, एकेटी ८८११, आयसीपीएल ८७ (प्रगती).

आंतरपीक : तुरीमध्ये मूग, उडीद, सोयाबीन, ज्वारी इ. मध्यम ते उशिरा तयार होणारे वाण- बीएसएमआर ८५३, पीकेव्ही तारा, पीडीकेव्ही आश्लेषा.

रंगानुसार वाण : पांढऱ्या दाण्याचे, बीडीएन ७११, गोदावरी, बीएसएमआर ८५३. लाल/तांबड्या/तपकिरी/ फिक्कट तपकिरी दाण्याचे. फुले राजेश्वरी,

फुले तृप्ती, फुले पल्लवी, बीडीएन ७०८, बीडीएन ७१६, रेणुका, बीएसएमआर ७३६, आयसीपीएल ८७, आयसीपीएल ८७११९, पीकेव्ही तारा, पीडीकेव्ही आश्लेषा, एकेटी ८८११



# खरिपाची पूर्वतयारी केल्यास होतो चांगला फायदा

खरिपाची पूर्वतयारी अत्यंत महत्त्वाची असते. त्या काळात मशागत, गादीवाफे, पेरणी, अन्नद्रव्ये नियोजन प्रभावी झाल्यास पुढील प्रत्येक टप्प्यातील व्यवस्थापन काटेकोर पद्धतीने करणे शक्य होते. उत्पादन व गुणवत्तेत वाढ होते. त्यादृष्टीने तज्ज्ञांनी दिलेल्या टिप्स निश्चित मार्गदर्शक ठरतील.

रोटाव्हेटरचा योग्य वापर : खरीप हंगामात भारी, काळ्या खोल, चिकन पोताच्या कमी निचरा असलेल्या जमिनीत वाफसा आल्यानंतर लगेचच इंग्रजी एल आकाराचे पाते असलेल्या रोटाव्हेटरचा वापर करू नये. त्यामुळे जमिनीमध्ये अर्धा फूट खोल ठोका बसतो. जमीन तळी धरते व पाणी जिरत नाही. पावसाच्या पाण्यामुळे अन्नद्रव्यांबरोबर मातीची धूप होते. उगवण चांगली होत नाही किंवा वाफसा चांगला न झाल्याने पुढे पिकाची वाढ खुंटते. त्यासाठी पाते सरळ असलेल्या रोटाव्हेटरचा वापर करून किंवा कल्टिव्हेटरचा वापर करून पेरणी करावी. हलक्या किंवा मध्यम किंवा पोयटा जमिनीत एल आकाराचे पाते असलेल्या रोटाव्हेटरचा वापर करता येईल.

चुनखडीयुक्त जमिनीचे नियोजन : जमीन समस्यायुक्त असल्यास (उदा. चुनखडीयुक्त, चोपण, क्षारयुक्त) पेरणी सरी वरंबा किंवा रुंद वरंबा सरी (बीबीएफ) पद्धतीने करावी. म्हणजे उगवण चांगली होते. जास्त पाऊस पडल्यास अतिरिक्त पाण्याचा निचरा होऊन वाफसा लवकर येतो व पिकांची पाने पिवळी पडत नाहीत.

पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया : बियाण्यांची उगवनक्षमता व खतांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी. प्रथम रासायनिक प्रक्रिया करून त्यानंतर दोन ते तीन तासांनी जैविक किंवा जिवाणूयुक्त खतांची प्रक्रिया करावी. त्यामुळे बियांसाठा सुरक्षित कवच तयार होवून बुरशी किंवा किडीपासून संरक्षण मिळते व उगवणक्षमता वाढते.



एकदल, द्विदल क्रम लावा : पिकांची फेरपालट करताना एकदल, द्विदल असा क्रम असावा. म्हणजे एकाच थरातील अन्नद्रव्ये घेतली जात नाहीत. द्विदल पिकांमुळे वरच्या थरात पालापाचोळा वाळून बेवड चांगला होतो. त्याचा फायदा पुढील एकदल पिकाला चांगला होतो. जमिनीतील सेंद्रिय कर्ब व लाभदायक सूक्ष्मजंतूंच्या संख्येत वाढ होते. काही शेतकरी मक्यावर-मका, तुरीवर-तूर, सोयाबीन-सोयाबीन, ऊस-ऊस, कांद्यावर कांदा अशाप्रकारे पीक पद्धतींचा अवलंब करतात त्यामुळे रोग व किडींचे चक्र न थांबता प्रादुर्भाव जास्त होतो व खर्च वाढतो. जमिनीची सुपीकता कमी होते. अशा परिस्थितीत समस्यायुक्त जमिनीमध्ये फेरपालटीत हिरवळीच पिके (धैंचा, ताग) घ्यावीत. त्यांची चांगली वाढ झाल्यावर ४५ दिवसांनी जमिनीत ती गाडून टाकावीत. त्यानंतर पुढील रब्बी हंगामात पिकांचे नियोजन करावे.

खत नियोजन : नत्र देताना त्याची विभागणी करून अर्धे नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश पेरणीवेळी द्यावे. उर्वरित नत्र पेरणीनंतर एक महिन्यांनी द्यावे. असे न केल्यास पेरणीनंतर खते उघड्यावर/ पृष्ठभागावर पडतात व खतांची कार्यक्षमता कमी होते. अशा परिस्थितीत पेरणी वाफसा परिस्थितीतच करावी. खते व बियाणे एकाचवेळी यंत्राच्या साह्याने किंवा दोन चाडे पाभरीने पेरावीत. ज्या शेतकऱ्यानी पेरणीची घाई केली व खत पेरून दिले नाही त्यांनी पुढील नियोजन करावे, उगवण झाल्यानंतर १५ ते २० दिवसांनी पिकांच्या ओळीपासून १५ ते २० सेंमी बाजूला मोगड्याच्या साह्याने खत पेरून मातीआड करावे किंवा खुरपणीपूर्वी जमिनीवर त्याचा वापर करावा. नारळ, आंबा, चिकू आदी फळझाडांना वयापरत्वे खत द्यावे. जून, जुलैमध्ये पूर्ण वाढलेल्या फळझाडास ५० किलो शेणखत अधिक दोन किलो १५-१५- १५ प्रति झाडास द्यावे. दुपारी झाडाच्या सावलीच्या ठिकाणी आळे करून खत मातीआड करावे.

पाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था : पेरणीनंतर उभ्या पिकात जास्त कालावधीचा पाऊस पडल्यास निचऱ्याची व्यवस्था करावी. थोडीशी उघडीप मिळाल्यास सायकल कोळपे दोन ओळींत वापरावे. म्हणजे जमीन वाफशावर येईल. पावसाचा खंड पडल्यास पिके पिवळी पडतात. त्यासाठी या दोन्हीही परिस्थितीत पिकांना पोषकद्रव्ये फवारणीतून द्यावे. त्यासाठी फुले द्रवरूप सूक्ष्मग्रेड (१०० मिलि प्रति १० लिटर) पाण्यातून फवारणी करावी. त्यानंतर ४ ते ५ दिवसांनी १९- १९- १९ हे विद्रव्य खत १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.




### महत्वाच्या घटना

१५३९ : बक्सर च्या जवळ चौसा या ठिकाणी अफगाण शासक शेरशाह सुरी आणि मुघल शासक बादशाहा हुमायू यांच्यात झालेल्या लढाईत बादशाहा हुमायू यांचा पराभव झाला.
१८९३ : महात्मा गांधीं यांनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली.
१९३८ : डी. सी. ४ प्रकारच्या विमानाचे प्रथम उड्डाण.
१९६५ : अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने परिणित दांपत्याने गर्भनिरोधक साधने वापरणे कायदेशीर ठरवले.
१९७५ : क्रिकेटच्या पहिल्या विश्वकरंडक स्पर्धेस इंग्लंडमध्ये सुरुवात झाली.
१९७९ : रशियातील कापुस्तिनयार येथून भास्कर-१ उपग्रहाचे प्रक्षेपण.
१९८१ : इस्रायलने इराकची ओसिराक परमाणू भट्टी नष्ट केली.
१९८५ : विम्बल्डन पुरुष एकेरीचे विजेतेपद १७ व्या वर्षी मिळवणारा बोरिस बेकर हा सर्वात तरुण खेळाडू बनला.
१९९१ : फिलिपाइन्स मधल्या माउंट पिनाटुबो ज्वालामुखीचा उद्रेक.
१९९३ : महात्मा गांधीं यांनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली.
१९९४ : नाणे निधीच्या उपव्यवस्थापकीय संचालकपदी अर्थतज्ज्ञ प्रभाकर नार्वेकर या प्रथमच एका भारतीयाची नियुक्ती झाली.
२००१ : युनायटेड किंग्डम मधील निवडणुकांत टोनी ब्लेरच्या नेतृत्वाखाली लेबर पार्टीला मोठे बहुमत.
२००४ : शिरोमणी अकाली दल (लाँगोवाल) या राजकीय पक्षाची स्थापना.
२००६ : अल कायदाचा इराकमधील म्होरक्या अबू मुसाब अल झरकावी हा अमेरिकन हवाईदलाने केलेल्या बॉम्बहल्ल्यात ठार झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३७ : अलोइस हिटलर, एडॉल्फ हिटलरचे वडील. (मृत्यू: ३ जानेवारी १९०३)
१८३७ : अलोइस हिटलर, एडॉल्फ हिटलरचे वडील.
१९१३ : लेखक टीकाकार मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष यांचा जन्म. (मृत्यू: १९ एप्रिल २०१०)
१९१४ : दिग्दर्शक, पटकथाकार, लेखक व पत्रकार ख्वाजा अहमद तथा के. ए. अब्बास यांचा जन्म. (मृत्यू: १ जुन १९८७)
१९१७ : अमेरिकन गायक, संगीतकार निर्माते डीन मार्टिन यांचा जन्म. (मृत्यू: २५ डिसेंबर १९९५)
१९४२ : लिबियाचा हुकूमशहा मुअम्मर गडाफी यांचा जन्म. (मृत्यू: २० ऑक्टोबर २०११)
१९४९ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश सुरिंदरसिंग निज्जर यांचा जन्मदिन
१९५७ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त सरन्यायाधीश व भारतीय सशस्त्र सैन्य न्यायाधिकरणाचे विद्यमान अध्यक्ष न्यायमूर्ती राजेंद्र मेनन यांचा जन्मदिन.
१९५९ : भारतीय अर्थशास्त्रज्ञ आणि भारत सरकारचे माजी मुख्य आर्थिक सल्लागार अरविंद सुब्रमण्यम यांचा जन्मदिन.
१९७४ : महेश भूपती, भारतीय टेनिसपटू.
१९७५ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित सुप्रसिद्ध भारतीय चित्रपट व टेलीव्हिजन मालिका निर्माता आणि दिग्दर्शिका एकता कपूर यांचा जन्मदिन.
१९८१ : अमृता राव, मराठी चित्रपट अभिनेत्री.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२१ : रोमेनियाचे क्रांतिकारी ट्युडोर व्लादिमिरेस्कु यांचे निधन.
१९५४ : ब्रिटीश गणितज्ञ आणि संगणकशास्त्रज्ञ ऍलन ट्युरिंग यांचे निधन. (जन्म: २३ जुन १९१२)
१९७० : ब्रिटिश साहित्यिक इ. एम. फोर्स्टर यांचे निधन. (जन्म: १ जानेवारी १८७९)
१९७८ : रोनाल्ड जॉर्ज व्रेफोर्ड नॉरिश (चित्रित), ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेता.
१९९२ : डॉ. स. ग. मालशे, मराठी वाङ्मयाचे अभ्यासक आणि संशोधक.
१९९२ : नासकार चे सहसंस्थापक बिल फ्रान्स सीनियर यांचे निधन. (जन्म: २६ सप्टेंबर १९०९)
१९९८ : शशिकांत नार्वेकर, गोमंतक मराठी अकादमीचे अध्यक्ष.
१९९९ : बालसाहित्यिक गोपीनाथ तळवलकर यांचे निधन. (जन्म: २९ नोव्हेंबर १९०७)
२००२ : बी. डी. जत्ती, भारतीय उपराष्ट्रपती.
२०२० : चिरंजीवी सर्जा (भारतीय कन्नड चित्रपट अभिनेते, जन्म: १ ऑक्टोबर १९८४).

## राज्यातील सात कारखान्यांकडे २३,२७९ कोटींची एफआरपी थकीत

मुंबई : राज्यातील गळीत हंगामात यंदा २१० कारखान्यांनी १०४५.६३ लाख उसाचे गाळप केले. या कारखान्यांकडे एकूण ४०,४४६ कोटी रुपयांची एफआरपी देय होती. त्यापैकी ३९७६९ कोटी रुपयांची एफआरपी देण्यात आली आहे, तर ६७७ कोटी रुपयांची एफआरपी थकीत आहे. तर राज्यातील सात कारखान्यांना साखर आयुक्तालयाने अवसायानाची (आरआसरी) नोटीस बजावली आहे.

यामध्ये शेतकऱ्यांचे २३,२७९.५४ लाख रुपये थकीत आहेत. यामध्ये सोलापूर, धाराशीव, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातील साखर कारखान्यांचा समावेश आहे. यामध्ये सर्वाधिक तीन कारखाने सोलापूर जिल्ह्यातील आहेत. जिल्हाधिकाऱ्यांकडून संबंधित कारखान्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. आरआरसी कारवाई होणाऱ्या कारखान्यांपैकी धोत्री येथील गोकुळ शुगरकडे १३०४६.२५ लाख रुपयांची एफआरपी थकीत आहे. टाकळी-सिकंदर येथील भीमा सहकारी साखर कारखान्याकडे ३०२२.२६ लाख रुपये, श्री संत कुर्मदास साखर कारखान्याकडे १५९७.५६ लाख रुपये, धाराशिव जिल्ह्यातील पारगाव येथील भिमाशंकर शुगर मिल्स लि.कडे १२२६.५१ लाख रुपये, अहिल्यानगर येथील केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याकडे २२४४.६५ लाख रुपये, नाशिकमधील एस. जे. शुगर डिस्टलरी ॲण्ड पॉवर प्रा. लि., यांच्याकडे १९३.०४ लाख रुपये आणि छत्रपती संभाजीनगरमधील सचिन घायाळ शुगर्स प्रा. लि., पैठण या कारखान्याकडे १९४९.२७ लाख रुपये, थकीत आहेत. भाजप खासदार धनंजय महाडिक यांचा मुलगा विश्वराज हे अध्यक्ष असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील टाकळी सिकंदर येथील भीमा कारखान्याचाही आरआरसी कारवाईमध्ये समावेश आहे.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
शनिवार दि.६ जून २०२६
५

# घनसावंगी पोलिसांची वाळू माफियावर धडाकेबाज कारवाई

## ८ हायवा ३ जेसीबी ३ कोटी ४५ लाखाचा मुद्देमाल जप्त

शिवाजी मस्के

जालना :घनसावंगी पोलीस ठाणे अंतर्गत मौजे भुतेगाव शिवारातील नदीपात्रामध्ये अवैधरित्या वाळु/रेतीची उत्खनन करुन भरतांना ०३ जेसीबी व ०८ हायवा टिपर पकडले. दिनांक ०४/०६/२०२६ रोजी सकाळी ०७.४५ वाजेच्या सुमारास घनसावंगी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक केतन राठोड यांना गोपनिय बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, घनसावंगी तालुक्यातील भुतेगाव शिवारातील दुधना नदीपात्रामध्ये काही इसम हे स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी मशीन व हायवा टिपरद्वारे अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुक करित आहे.

मिळालेल्या बातमीची खात्रीकरुन कारवाई करायाची असल्याने पो. नि. केतन राठोड यांनी ०२ वेगवेगळे पथक तयार करुन मौजे भुतेगाव शिवारातील दुधना नदीपात्रात पोनि केतन राठोड व त्यांचे पथक पोहचले त्यावेळी त्यांना नदीपात्रामध्ये काही इसम हे ०३ मशीनच्या मदतीने ०८ हायवा टिपरमध्ये



वाळुची रेतीची दुधना नदीपात्रातून अवैधरित्या उत्खनन करून भरतांना दिसुन आल्याने पथकाने सदर ठिकाणी तात्काळ छापा मारुन सदरच्या ०३ मशीन व ०८ हायवा टिपर तसेच त्यांचे चालकांना ताब्यात घेवुन त्यांना वाळु उत्खनन व वाहतुकीच्या परवाना याबाबत चौकशी केली.

परंतु हायवा टिपर चालक व चालक यांच्याकडे पावती व परवाना मिळुन आला नाही. मा. जिल्हाधिकारी, कार्यालय जालना यांचे वाळु उत्खनन व वाहतुक करण्याबाबतचे आदेश उपलब्ध करुन दिलेले नाहीत. त्यामुळे सदरचे ०८ हायवा टिपर व ०३ मशीन त्यामध्ये १२ ब्रास वाळु/रेती असा एकुण ३,४५,५५,०००/- रुपये. (अक्षरी तीन कोटी, पंचेचाळीस लाख, पंचावन्न हजर रुपये असा मुद्देमाल जप्त करुन पुढील कारवाई कामी घनसावंगी पोलीस ठाण्यात आणलेला असून सदर बाबत आज दिनांक ०४/०६/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदरची कामगीरी ही मा. पोलीस अधीक्षक, जालना श्री तेघबीर सिंग संधु साहेब, मा. अपर पोलीस अधीक्षक, जालना श्री विक्रम साळी साहेब. मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग अंबड श्री डॉ. सिध्देश्वर धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली घनसावंगी पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक केतन राठोड व त्यांच्या पथकाने पार पाडली आहे.

# समृद्धीने स्वखर्चातून केला शेतरस्ता; शेकडो शेतकऱ्यांना मोठा दिलासा



घनसावंगी। प्रतिनिधी

घनसावंगी मतदारसंघातील शेत पानंद रस्त्यांचे जनक समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील यांनी समृद्धी साखर कारखान्याच्या माध्यमातून स्वखर्चातून हाती घेतलेल्या शिंदेवडगाव ते आवलगाव या २ किलोमीटर शेतरस्त्याचे मातीकाम अखेर पूर्ण झाले आहे. पावसाळा अगदी तोंडावर आलेला असतानाच या रस्त्याचे काम वेळेत पूर्ण झाल्यामुळे परिसरातील शेकडो शेतकरी बांधवांना मोठा दिलासा मिळाला असून, शेतात जाण्या-येण्याचा त्यांचा मार्ग मोकळा झाला आहे.

सतीश घाटगे यांनी घनसावंगी, अंबड व जालना तालुक्यातील २१५ किमी पेक्षा जास्त शेत पानंद रस्ते स्वखर्चातून खुले करून शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. शेतकऱ्यांना खरीप हंगामात शेतीमाल आणि अवजारांची वाहतूक करताना चिखलाचा मोठा सामना करावा लागतो. ही अडचण लक्षात घेऊन सतीश घाटगे यांनी तातडीने पावले उचलत कारखान्यामार्फत या कामाला गती दिली. केवळ मातीकामावरच न थांबता, हा रस्ता कायमस्वरूपी टिकून राहावा यासाठी आगामी काळात 'मुख्यमंत्री बळीराजा शेत-पानंद रस्ते' योजनेच्या माध्यमातून या रस्त्याचे मजबुतीकरण आणि खडीकरण करून तो अधिक दर्जेदार बनवणार असल्याचे सतीश घाटगे यांनी सांगितले आहे. या शेतकरीभिमुख पुढाकारामुळे शिंदेवडगाव आणि आवलगाव परिसरातील शेतकरी वर्गातून अत्यंत समाधान व्यक्त केले जात आहे. सर्व शेतकऱ्यांनी सतीश घाटगे व कारखाना प्रशासनाचे आभार मानले आहे.

# भर उन्हात झाडांसाठी ठरले 'जलदूत'; ४ हजार झाडांना जीवदान

## जालना शहरातील पर्यावरणप्रेमी डॉ.विठ्ठल राजकर यांचा पुढाकार



जालना। प्रतिनिधी

यंदाच्या उन्हाळयात तापमानाने ४३ अंश सेल्सियसचा टप्पा गाठल्याने नागरिकांसह प्राणी आणि वनस्पतींनाही तीव्र उष्णतेचा फटका बसला. अनेक सामाजिक संस्था आणि नागरिकांनी पक्षी व मुक्या प्राण्यांसाठी पाण्याची व्यवस्था केली. मात्र, रस्त्यालगतची झाडे उन्हाच्या झळांनी करपत असल्याचे चित्र दिसत होते. अशा परिस्थितीत सामाजिक कार्यकर्ते डॉ. विठ्ठल राजकर यांनी संपूर्ण उन्हाळाभर झाडांना पाणी देण्याचा वसा घेत चार हजार झाडांचे संवर्धन केले. उन्हाच्या कडाक्यात बहुतांश नागरिक घरातच थांबणे पसंत करत असताना डॉ. राजकर यांनी शहरातील रस्त्यांच्या कडेला असलेल्या झाडांपर्यंत पाणी पोहोचवण्याचे काम हाती घेतले. प्रत्येक झाडाला दर आठ दिवसांनी पाणी मिळालेच पाहिजे, असे नियोजन केले. त्यांनी शहरातील विविध भागांतील झाडांना नियमित पाणी दिले. सुमारे तीन महिने सलग हे काम सुरू ठेवताना त्यांची प्रकृतीही बिघडली. त्यांना आठ दिवस रुग्णालयात उपचार घ्यावे लागले.

मात्र, उन्हाने व्याकूळ झालेल्या झाडांना पाणी देऊन त्यांना जागवल्याचे समाधान सर्व त्रासांपेक्षा मोठे असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. या उपक्रमामुळे उन्हाळ्याच्या तीव्र झळांमध्येही हजारो झाडे तग धरून राहिली. नियमित पाणी मिळाल्याने अनेक झाडांची वाढही चांगली झाली. ती अधिक हिरवीगार आणि डेरेदार झाल्याचे दिसून येत आहे. आता जून महिना सुरू झाला तरी अद्यापही पाऊस झालेला नाही. त्यामुळे झाडांना पाणी देण्याचे हे काम सुरूच आहे. या ठिकाणी जगवली झाडे पांजरपोळ गोल्डन ज्युबली, फाईन लिव्हिंग ते राजुरी कॉर्नर, बालाजी चौक ते शिंदे हॉस्पिटल, फायर स्टेशन ते गणपती नेत्रालय, जेईएस कॉलेज ते दुर्गा माता पोलिस प्रशिक्षण केंद्र, राणी लक्ष्मीबाई चौक ते मिशन हॉस्पिटल, जिजाऊ प्रवेशद्वार ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, गुरुबचन चौक ते एसआरपीएफ मंठा चौफुली, रेल्वे स्टेशन ते नुतन वसाहत पुल, मुक्तेश्वर द्वार ते मोतीबाग, भोकरदन नाका ते बस स्थानक-मामा चौक. या प्रकल्पात अनेकांचे श्रमदान या प्रकल्पात अनेक स्वयंसेवकांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवला. समाजाने मदत केल्याने आम्ही हे काम करु शकलो. या माध्यमातून प्रत्येक आठवड्याला जवळपास २५ टँकर पाणी दिले. कुठे झाडांना पाण्याची गरज असेल तर आम्हाला कळवा असेही आवाहन आम्ही केले. त्यानुसार झाडे जगविण्यासाठी प्रयत्न केला. आज झाडांना पाणी दिले तर उद्या आपल्यालाही पाणी आणि ऑक्सिजन मिळेल या भावनेने हे काम केले. सलग तीन महिने झाडांना पाणी दिल्यानंतर आता खऱ्या अर्थाने समाधान वाटते आहे.

# महिलांनी अन्यायाविरुद्ध तक्रार देण्यासाठी पुढे येण्याची गरज

## सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रेमलता जगताप यांचे प्रतिपादन

हिंगोली। प्रतिनिधी

महिलांवरील अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी कायदेशीर तरतुदी आहेत मात्र अनेक वेळा महिला तक्रार देण्यासाठी धजावत नाहीत. मात्र आता महिलांनी अन्याय अत्याचाराविरुद्ध पुढे येऊन तक्रार देण्याची गरज असल्याचे मत हिंगोलीच्या दामिनी पथकाच्या सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रेमलता जगताप यांनी शुक्रवारी तारीख ५ केसापूर येथे व्यक्त केले. हिंगोली तालुक्यातील केसापूर येथे पोलिस अधीक्षक निलाभव रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित जनजागृती कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी महिला पोलिस कर्मचारी आरती साळवे, पोलिस अंमलदार गणेश सोनटक्के, पोलिस हवालदार हिम्मतराव सरनाईक, तथागत इंगळे, मुख्याध्यापक हरिभाऊ मुटकुळे, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रेमलता जगताप यांनी महिलांच्या व बालकांच्या सुरक्षेसाठी अस्तित्वात असलेल्या विविध कायद्यांची सविस्तर माहिती दिली. महिलांवरील अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार, छेडछाड, सायबर गुन्हे, मानवी तस्करी तसेच बालकांवरील लैंगिक अत्याचार यांसारख्या गंभीर विषयांवर मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील महिला अद्यापही अन्याय सहन करत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे अन्यायाच्या घटना वारंवार घडत असून आता महिलांनीच अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महिलांच्या संरक्षणासाठी शासनाने उपलब्ध करून दिलेल्या विविध कायदेशीर तरतुदींची माहिती देत कोणत्याही प्रकारच्या अन्याय, अत्याचार किंवा शोषणाची घटना घडल्यास तात्काळ पोलिस प्रशासनाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले. यावेळी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अ‍ॅड सरस्वती कोरडे यांनी बालविवाह प्रतिबंधक कायदा, गाव बाल संरक्षण समिती, पोक्सो कायदा, बाल संरक्षण यंत्रणा, संकटग्रस्त व गरजू बालकांसाठी उपलब्ध शासकीय सुविधा, बालकल्याण समितीची भूमिका तसेच जिल्हा बाल संरक्षण कक्षामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. बालकांवरील अत्याचार, दुर्लक्ष, शोषण अथवा बालविवाहाची माहिती मिळाल्यास ती तात्काळ संबंधित यंत्रणांना देण्याचे आवाहन त्यांनी केले. चाईल्ड हेल्पलाईन १०९८ या मोफत व २४ तास उपलब्ध असलेल्या आपत्कालीन सेवेबाबत माहिती देत अडचणीत असलेल्या किंवा संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी ही सेवा अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगितले. बालकांना कोणतीही समस्या निर्माण झाल्यास अथवा इतर कोणतेही बालक संकटात आढळल्यास तात्काळ १०९८ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान उपस्थित महिला, युवक व बालकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांचे तसेच त्यांच्या शंकांचे सहाय्यक पोलिस निरीक्षक जगताप यांनी उत्तरे देऊन निरसन केले.



**अंबड : ऑफिस चे सब पोस्टमास्टर श्री. किरण गवरे यांची बदली जालना आर एस पोस्ट ऑफिस येथे झाली आहे त्यानिमित अंबड पोस्ट ऑफिस स्टाफ कर्मचाऱ्याकडून श्री गवारे यांना निरोप देण्यात आला.**

# तुळजाभवानी मंदिरात बिडकर पायऱ्यांमार्गे भाविकांना प्रवेश

## ५८ कोटींच्या संवर्धन कामांमुळे बदल



तुळजापूर। प्रतिनिधी

तुळजाभवानी मंदिरात सुरू असलेल्या विकासकामांच्या पार्श्वभूमीवर बुधवार (दि. ०३) पहाटेपासून भाविकांना बिडकर पायऱ्यांमार्गे तुळजाभवानी मंदिरात सोडण्यास प्रारंभ करण्यात आला आहे. मात्र पुरेशा जनजागृतीअभावी शेकडो भाविक थेट महाद्वार परिसरात येत असून, बंद महाद्वारामुळे सुरक्षा रक्षक व भाविकांमध्ये वादाचे प्रसंग घडत आहेत. तुळजाभवानी मंदिरातील निंबाळकर दरवाजालगतच्या ओवऱ्यांचे बांधकाम ०१ जूनपासून पुन्हा सुरू करण्याचा निर्णय मंदिर संस्थानने घेतला होता.

या पार्श्वभूमीवर महंत व पुजारी मंडळासोबत झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे भाविकांचे दर्शन अधिक सुलभ, सुरक्षित व सुरळीत होण्यासाठी भाविकांना कुंभार गल्लीतील बिडकर पायऱ्यांमार्गे मंदिरात सोडण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला होता.

या निर्णयानुसार बुधवार (दि. ०३) पहाटेपासून भाविकांना बिडकर पायऱ्यांमार्गे तुळजाभवानी मंदिरात प्रवेश देण्यास सुरुवात करण्यात आली असून, राजे शहाजी महाद्वारासमोर बॅरिकेडिंग करून प्रवेश बंद करण्यात आला आहे. दरम्यान, महाद्वारमार्गे प्रवेश बंद करण्यात आल्याबाबत मंदिर संस्थानकडून पुरेशी जनजागृती न झाल्याने शेकडो भाविक नेहमीप्रमाणे महाद्वार परिसरात गर्दी करत आहेत. ५८ कोटी रुपयांची जतन व संवर्धनाची कामे तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या स्वनिधीतून मंदिरात ५८ कोटी रुपयांची जतन व संवर्धनाची कामे सुरू आहेत.

यामध्ये भवानीशंकर दर्शनमंडप व सिंहगाभाऱ्याचे पुनर्निर्माण तसेच चोपदार दरवाजालगत एक्झॉस्ट फॅनच्या जागी नवीन दरवाजा, पलंगाच्या दोन्ही बाजूंना दरवाजे, कडी दरवाजाची रुंदी वाढवणे, होमकुंडासमोरून बाहेर पडण्यासाठी नवीन मार्ग अशा विविध कामांचा समावेश आहे.

# गावरान तुपाच्या नावाखाली भेसळ; तीर्थपुरीत १३ लाखांचा साठा जप्त

## फूड पॅकेजिंगच्या आड तेल व इसेन्स मिसळून भेसळयुक्त तूप केले तयार

तीर्थपुरी। प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील तीर्थपुरी येथे गावरान तुपाच्या नावाखाली भेसळयुक्त तूप तयार करून विक्री होत असल्याचा प्रकार अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कारवाईत उघड झाला आहे. बुधवारी करण्यात आलेल्या या कारवाईत सुमारे १३ लाख रुपयांचा संशयित तुपाचा व खाद्यतेलाचा साठा जप्त केला आहे. या कारवाईनंतर संबंधित कारखाना पुढील आदेशापर्यंत सील करण्यात आला आहे.



अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने बुधवारी गोविंद मुंदडा यांच्या मुंदडा इंडस्ट्रीज-वर छापा टाकला. यावेळी फूड पॅकेजिंगच्या आड तुपात खाद्यतेल व इसेन्स मिसळून भेसळयुक्त तूप तयार केले जात असल्याचे प्राथमिक तपासणीत आढळून आले. कारवाईत विविध ब्रँडच्या तुपाचे पाच नमुने घेण्यात आले. तसेच खुल्या स्वरूपातील तूप, रिमाइंड सोयाबीन तेल आणि इसेन्सचे नमुनेही तपासणीसाठी जप्त करण्यात आले. पथकाला एकूण १ हजार ९०३.६ लिटर साठा आढळून आला. सर्व नमुने प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर कारवाई करण्यात येणार आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहआयुक्त नि. सू. कुलकर्णी , एस. आर. करकाळे यांच्या मार्गदर्शनाखालीनिखिल कुलकर्णी, अश्विनी तांबे, अनुजा नगरारे, तसेच नमुना सहायक धम्मदीप नरवडे यांच्या पथकाने ही कारवाई केली. १ . एक चमचा तूप तळहातावर घ्या. शुद्ध तूप शरीराच्या उष्णतेने लगेच वितळते.भेसळयुक्त तूप वितळण्यास जास्त वेळ लागू शकतो. २. तूप थोडे गरम करा.शुद्ध तुपाला नैसर्गिक आणि ठसठशीत सुगंध येतो. कृत्रिम इसेन्स मिसळले असल्यास वास तीव्र किंवा अस्वाभाविक वाटू शकतो.

३. तूप एका भांड्यात ठेवून काही तास फ्रिजमध्ये ठेवा. शुद्ध तूप साधारणपणे एकसारखे गोठते. वेगवेगळ्या थरांमध्ये गोठल्यास तेलाची भेसळ असण्याची शक्यता असते. ४. तुपात थोडे आयोडीन टाकल्यास रंग निळा झाला तर स्टार्च किंवा इतर पदार्थांची भेसळ असू शकते. ५. शुद्ध तूप समान रंगाने वितळत असते. भेसळ असल्यास तळाशी अवशेष किंवा वेगळे थर दिसू शकतात. डॉ.अमोल खांडेभराड, रसायन शास्त्र विभाग,जेईएस महाविद्यालय अन्न व औषधी प्रशासन विभागाने येथून तुपाचे नमुने तपासणीसाठी घेतले आहेत. हे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. त्याचा अहवाल येण्यास १५ ते २० दिवसांचा कालावधी लागु शकतो. थेट हृदयावर होऊ शकतो परिणाम भेसळयुक्त तुपामुळे पोटदुखी, उलट्या किंवा जुलाब, वारंवार पोट फुगणे तसेच हृदयविकाराचा धोका वाढू शकतो. कृत्रिम रसायने किंवा दर्जाहीन घटकांचा सतत वापर केल्यास यकृताला अतिरिक्त काम करावे लागते.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
शनिवार दि.०६ जून २०२६ | ६

# ऊसतोड कामगारांच्या 'स्थलांतर पूर्व नियोजन' बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय

## कामगारांसाठी स्वतंत्र ओळखपत्रे, आरोग्य शिबिरे, जन्मदाखले व योजनांचा लाभ मिळवून देण्यावर भर

बीड । प्रतिनिधी

ऊसतोड कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी प्रशासन व स्वयंसेवी संस्थांनी समन्वयाने काम करण्याची गरज असून, कामगारांच्या सुविधेसाठी तातडीने नवीन कार्यपद्धती (एसओपी) तयार करून लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून ओळखपत्रांचे वितरण करण्यात यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले.

मराठवाडा ग्रामीण विकास संस्था संचलित ऊसतोड कामगार प्रकल्पांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय 'स्थलांतर पूर्व नियोजन' समन्वय बैठकीत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहमान, सहाय्यक समाज कल्याण आयुक्त भोगले, जिल्हा आरोग्य अधिकारी गंडाळ, शिक्षणाधिकारी, महिला व बालविकास अधिकारी, सहाय्यक कामगार आयुक्त, ऊसतोड कामगार कृती समितीचे बाजीराव ढाकणे यांच्यासह विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी आणि मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीत ऊसतोड कामगारांचे स्थलांतर, आरोग्य, शिक्षण, पोषण, सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि सामाजिक सुरक्षा या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. कामगारांचा डेटा ज्या जिल्ह्यात किंवा राज्यात ते स्थलांतरित होतात, त्या प्रशासनाशी सामायिक करण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव मांडण्यात आला. यामुळे स्थलांतरित



कामगारांना तेथील शासकीय योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे मिळू शकेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

आरोग्य सेवांसाठी विशेष उपक्रम

ऊसतोड कामगारांच्या कामाच्या वेळा लक्षात घेऊन सकाळी लवकर अथवा सायंकाळी आरोग्य शिबिरे आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. या शिबिरांमध्ये मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. तसेच स्थलांतरित महिलांमधून 'आरोग्य सखी' ची निवड करून त्यांना प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण देण्याची योजना देखील बैठकीत मांडण्यात आली.

शिक्षण व बालहक्कांवर भर

ऊसतोड कामगारांच्या मुलांचे शिक्षण खंडित होऊ नये यासाठी मंजूर झालेल्या सर्व 'संत भगवान बाबा बालिका आश्रम शाळा' आगामी शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्याचे निर्देश शिक्षण विभागाला देण्यात आले. याशिवाय ज्या मुलांकडे जन्मनोंदणी दाखले उपलब्ध नाहीत, त्यांच्यासाठी विशेष मोहीम राबवून जन्मदाखले उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला.

हेल्पलाइनची प्रभावी अंमलबजावणी

ऊसतोड कामगारांच्या समस्या आणि तक्रारींचे निराकरण करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या १८००२३३१२१२ या टोल फ्री हेल्पलाइन क्रमांकाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या विविध योजनांची गावागावांत व्यापक जनजागृती करण्याचे निर्देश समाज कल्याण विभागाला देण्यात आले. बैठकीच्या प्रारंभी जिल्हा संपर्क अधिकारी एच. पी. देशमुख यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. एमआयएस अधिकारी अनुप मोरे यांनी ऊसतोड कामगारांसमोरील समस्या, आव्हाने आणि संभाव्य उपाययोजनांवर सविस्तर सादरीकरण केले. तर अश्वजीत जाधव यांनी आभार प्रदर्शन केले.यावेळी बाजीराव ढाकणे, विशाल झीन्जूर्डे, राहुल घनघाव, ओमप्रकाश गिरी, मनीषा तोकले आदींनी ऊसतोड कामगारांच्या विविध समस्या प्रशासनासमोर मांडल्या. प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांनी एकत्रितपणे काम करून ऊसतोड कामगारांचे प्रश्न प्राधान्याने सोडवावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बैठकीच्या शेवटी केले.

# बायपासवरील उड्डाणपूल व सर्व्हिस रोडची कामे युद्धपातळीवर

## डिसेंबर २०२६ पर्यंत कामे पूर्ण करण्याचे आ.संदीप क्षीरसागर यांचे निर्देश



बीड । प्रतिनिधी

बीड शहरा जवळील बायपास मार्गावर सुरू असलेल्या उड्डाणपूल आणि स्लीप सर्व्हिस रोडच्या कामांची आमदार संदीप क्षीरसागर यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे (छक-ख) अधिकारी आणि संबंधित कंत्राटदारांसमवेत प्रत्यक्ष पाहणी केली. प्रलंबित असलेली ही कामे आता प्रत्यक्ष सुरू झाल्यामुळे त्यांनी समाधान व्यक्त केले असून, डिसेंबर २०२६ अखेरपर्यंत सर्व कामे पूर्ण करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत.

केंद्र सरकार आणि आयआरसीच्या मार्गदर्शक तत्वांनुसार बीड शहरात प्रवेश करण्यासाठी छत्रपती संभाजी महाराज चौक व महालक्ष्मी चौक येथे उड्डाणपूल, तसेच बीड-इमामपूर, बीड-नाथापूर आणि बीड-परळी मार्गांना जोडणारे स्लीप सर्व्हिस रोड असणे आवश्यक होते. मात्र, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या चुकीच्या नियोजनामुळे ही कामे रखडली होती. या दुर्लक्षामुळे बायपासवर झालेल्या अपघातांत आतापर्यंत १३ निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला होता.नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्र. ११७६/२०२४ दाखल केली होती. न्यायालयाने ही याचिका मान्य करत २५ सप्टेंबर २०२४ रोजी छत्रपती संभाजी महाराज चौक व महालक्ष्मी चौक येथे उड्डाणपूल, तसेच बीड-इमामपूर, बीड-नाथापूर व बीड-परळी मार्गांवर स्लीप सर्व्हिस रोड उभारण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. न्यायालयाच्या आदेशानंतर आता छत्रपती संभाजी महाराज चौक आणि महालक्ष्मी चौक येथील उड्डाणपूल तसेच इतर मार्गांवरील स्लीप सर्व्हिस रोडची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. आ.क्षीरसागर यांनी या कामांची गती वाढवण्याच्या सूचना दिल्या ◀◀ पान ३ वर




बीड जिल्हा शिवसेना प्रमुख (शिंदे गट) अनिल दादा जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना फोटो फ्रेम भेट देताना दैनिक राज्य लोकतंत्रचे कार्यकारी संपादक सुभाष चौरे, उपसंपादक विशाल साळुंके, अनिल जगताप यांचे खाजगी सचिव प्रतीक कांबळे उपस्थित होते.

# अपघाती मृत्यूचा बनाव उघड, ३ दिवसांत खुनाचा गुन्हा उघडकीस!

बीड । प्रतिनिधी

नेकनूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडलेल्या एका अत्यंत गंभीर आणि गुंतागुंतीच्या प्रकरणाचा छडा लावण्यात पोलिसांना अवघ्या तीन दिवसांत मोठे यश आले आहे. आरोपींनी अत्यंत हुशारीने खुनाचा गुन्हा लपवून तो अपघाती मृत्यू असल्याचा बनाव रचला होता, मात्र पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि चातुर्याच्या जोरावर या बनावाचा पर्दाफाश केला आहे.

अपघाताचा बनाव कसा रचला?

घटनेच्या दिवशी मयताचा मृतदेह त्याच्या वाहनासह रस्त्याच्या कडेला आढळून आला होता. प्रथमदर्शनी हा रस्ते अपघात असावा, असे चित्र आरोपींनी निर्माण केले होते.




सुरुवातीला पोलिसांकडे कोणताही ठोस सुगावा उपलब्ध नव्हता. मात्र, घटनास्थळाची पाहणी, उपलब्ध पुरावे आणि शवविच्छेदन अहवालातील निष्कर्ष यामध्ये पोलिसांना मोठी विसंगती आढळून आली. त्यामुळे हा अपघात नसून घातपात असावा, असा संशय बळावल्याने पोलिसांनी त्या दृष्टीने बारकाईने तपास सुरू केला.

असा लागला छडा

बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावंत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि केजचे उपविभागीय पोलीस अधिकारी वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली नेकनूर पोलिसांचे विशेष तपास पथक तात्काळ कामाला लागले. पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी आरोपींनी पुरावे नष्ट करण्याचा पूर्ण प्रयत्न केला होता. परंतु, पोलिसांनी खालील तांत्रिक व पारंपारिक पद्धतींचा वापर करून ◀◀ पान ३ वर

# आष्टी,पाटोदा व शिरूर कासार तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त कोल्हापुरी बंधाऱ्यांच्या दुरुस्तीला मंजुरी

आष्टी । प्रतिनिधी

सप्टेंबर २०२५ मध्ये आष्टी, पाटोदा व शिरूर कासार तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी व महापुरामुळे नुकसानग्रस्त झालेल्या कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्यांच्या दुरुस्ती कामांना अखेर मंजुरी मिळाली असून,आमदार सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या कामांसाठी निधी उपलब्ध झाला आहे. त्यामुळे तीनही तालुक्यांतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.



गतवर्षी झालेल्या मुसळधार पावसामुळे नद्या-नाल्यांना पूर येऊन अनेक कोल्हापुरी बंधाऱ्यांचे भराव वाहून गेले होते. काही ठिकाणी बंधाऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. परिणामी शेतजमिनी खरडून गेल्या, सिंचन व्यवस्था विस्कळीत झाली आणि शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले.या गंभीर परिस्थितीची दखल घेत आमदार सुरेश धस यांनी हिवाळी व अर्थसंकल्पीय अधिवेशनात हा प्रश्न प्रभावीपणे मांडत शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मदत व पुनर्वसन विभागाच्या 'गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार' योजनेअंतर्गत तसेच नाम फाउंडेशन व जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून सुमारे १.५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या निधीतून नदी खोलीकरण, रुंदीकरण, भराव बांधकाम तसेच नुकसानग्रस्त बंधाऱ्यांच्या दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत.

मागील दोन आठवड्यांपासून नाम फाउंडेशन व आ. सुरेश धस मित्र मंडळाच्या माध्यमातून कामांना गती मिळाली असून पावसाळ्यापूर्वी ही कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. यामुळे सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता वाढून हजारो शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार आहे.

आष्टी तालुक्यातील मंजूर बंधारे

देवीनिमगाव को.प.ब. क्र. १,बेलगाव को.प.ब. क्र. ३,वाकी को.प.ब.वाघळूज को.प.ब. क्र. २, वाघळूज को.प.ब. क्र. ३,पाटण को.प.ब. क्र. १ वाळुंज को.प.ब. क्र. २,चिखली को.प.ब. क्र. ३ खानापूर को.प.ब.,कर्हेवाडी को.प.ब. क्र. ३, सुलेमान देवळा को.प.ब.,दौलावडगाव को.प.ब. क्र. ३,पाटोदा तालुक्यातील मंजूर बंधारे,नाळवंडी को.प.ब. क्र. १,येवलवाडी को.प.ब.,डोंमरी को.प.ब.,नाळवंडी को.प.ब. (दुसरे काम) शिरूर कासार तालुक्यातील मंजूर बंधारे तरडगव्हाण को.प.ब. क्र. १,झापेवाडी को.प.ब.,शिरापूर धुमाळ को.प.ब. क्र. १, ◀◀ पान ३ वर

# शॉर्टसर्किटने होके कुटुंबाचा संसार राख

## चार लाखांची रोकड, सोने-चांदीसह लाखोंचे नुकसान

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील पाटील गल्ली परिसरात गुरुवारी सकाळी शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या भीषण आगीत होके कुटुंबाचा संसार अक्षरशः राख झाला. या दुर्घटनेत घरातील सुमारे चार लाख रुपयांची रोकड, सहा तोळे सोने, चांदीचे दागिने तसेच संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले असून लाखोंचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पाटील गल्ली येथील विकास संदीपान होके यांच्या निवासस्थानी दि ०४ जुन गुरुवार रोजी सकाळी सुमारे





११:०० ते ११.३० वाजण्याच्या दरम्यान अचानक शॉर्ट सर्किट होऊन आग लागली.आग लागल्याचे लक्षात येईपर्यंत घराच्या मोठ्या भागाला आगीने वेढा घातला होता. त्यामुळे घरातील साहित्य सुरक्षित बाहेर काढण्याची संधी कुटुंबीयांना मिळू शकली नाही. या आगीत वाहन खरेदीसाठी घरात ठेवलेली सुमारे चार लाख रुपयांची रोकड जळून नष्ट झाली. तसेच सहा तोळे सोने,चांदीचे दागिने,फ्रिज, कुलर,दूरदर्शन संच,कपाट,कपडे, गहू,तांदूळ आणि इतर संसारोपयोगी वस्तू आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्या. संपूर्ण ◀◀ पान ३ वर

# घरात घुसून प्राणघातक हल्ला; ग्रामीण पोलीस ठाण्यात ११ जणांविरुद्ध गुन्हा

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील निपाणी टाकळी शिवारातील माजलगाव-मोगरा रोडवरील परिसरात घरात घुसून प्राण घातक हल्ला करण्यात आला.ही घटना दि ०३ जुन बुधवार रोजी रात्री ९:०० वाजण्याच्या दरम्यान घडली. दरम्यान झालेल्या प्राणघातक हल्ल्या प्रकरणी ११ जणांविरुद्ध माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, वसंत भाऊराव राठोड रा.वसंतनगर तांडा,निपाणी टाकळी यांच्या घरावर दि.३ जून बुधवार रोजी रात्री सुमारे ९:०० वाजण्याच्या सुमारास आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून हल्ला केल्याचा आरोप आहे. गुन्ह्यातील आरोपींनी कु-हाड, कोयता आणि काठ्यांच्या साहाय्याने घरात घुसून फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांवर जीवघेणा हल्ला केला.या हल्ल्यात काही जण गंभीर जखमी झाले असून घरातील साहित्याची तोडफोड करण्यात आली.तसेच शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणी लक्ष्मण सर्जेराव चव्हाण,विठ्ठल रामभाऊ चव्हाण, रमेश किसन आडे, अशोक संपत चव्हाण,विलास अशोक चव्हाण, रामेश्वर गणपत, चव्हाण,अंकुश बन्सी चव्हाण, राहुल भानदास चव्हाण,अजय धोंडीराम ◀◀ पान ३ वर

# मंत्री पंकजा मुंडेनी घेतले भगवान पुरुषोत्तमाचे दर्शन

माजलगाव । प्रतिनिधी

राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी दि ०५ जुन शुक्रवार रोजी माजलगाव तालुक्यातील पावन क्षेत्र पुरुषोत्तमपुरी येथे जाऊन मनोभावे भगवान पुरुषोत्तमाचे दर्शन घेतले.

माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथे अधिक मासाचे औचित्य साधून भगवान पुरुषोत्तम यांच्या दर्शनाला आणि पूजेला अध्यात्मिकदृष्ट्या अत्यंत विशेष महत्त्व आहे.दि ०५ जुन शुक्रवार रोजी महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आई प्रज्ञाताई मुंडे यांच्यासोबत पुरुषोत्तमपुरी येथील भगवान पुरुषोत्तम मंदिराला भेट देऊन



भगवान पुरुषोत्तमाचे मनोभावे दर्शन घेतले आणि विधिवत पूजा-अर्चा केली. या पवित्र प्रसंगी सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि मंगलमयता लाभो, हीच भगवान पुरुषोत्तम यांच्या चरणी मंत्री पंकाजा मुंडे यांनी प्रार्थना केली.यावेळी भगवान पुरुषोत्तम मंदीर ट्रस्टच्या वतीने मंत्री ना. पंकाजा मुंडे यांचा भगवान पुरुषोत्तम यांचा फोटो देत सत्कार करुन सन्मान करण्यात आला.

# मयत भावाला कागदावर जिवंत करून जमीन-बोअरवेल हडपली

## पुतण्या-मुंद्राक विक्रेता ,नोटरी वकिल, तलाठी-मंडळ अधिकाऱ्यासह ७ जणांविरुद्ध धारूर पोलीस ठाण्यात तक्रार !

**धारूर । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यात महसुली भ्रष्टाचाराचा कळस करणारी घटना समोर आली आहे. मयत व्यक्तीला कागदोपत्री जिवंत दाखवून बोगस दस्तऐवज तयार करून वडिलोपार्जित जमीन व बोअरवेल हडपण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी मयताच्या सख्ख्या भावाने शुक्रवारी दि.५ रोजी धारूर पोलीस ठाण्यात पुतण्या, नोटरी वकील, मुद्रांक विक्रेता, तत्कालीन तलाठी व मंडळ अधिकाऱ्यासह ७ जणांविरुद्ध लेखी तक्रार दाखल करून गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की

वाघोली ता. धारूर येथील रहिवासी कै. आबासाहेब बाबुराव गव्हाणे यांचे दि. १८/०९/२०२१ रोजी निधन झाले.त्यांच्या मृत्यूनंतर सह दिवाणी न्यायाधीश, धारूर यांच्या न्यायालयाने दि. १४/१२/२०२१ रोजी वारसा प्रमाणपत्र निर्गमित करून त्यांचे कायदेशीर वारस म्हणून मुलगे अशोक, गोकुळ व नितीन यांची नोंद केली. मात्र, वाघोली येथील सर्व्हे नं. २४६ मधील ६१ गुंठे वडिलोपार्जित जमीन ही कै. आबासाहेब व त्यांचे भाऊ मधुकर बाबुराव गव्हाणे यांच्या सामायिक मालकीची असून त्यात सामायिक बोअरवेल आहे. या जमिनीची अद्याप कायदेशीर वाटणी झालेली नाही.

**मयताला जिवंत करून घोटाळा कसा केला?**

तक्रारदार मधुकर गव्हाणे यांच्या आरोपानुसार, आरोपी पुतण्या अशोक आबासाहेब गव्हाणे याने चुलत्याचा हिस्सा हडपण्यासाठी संगनमताने कट रचला

दि. १०/०७/२०२४ रोजी मयत आबासाहेब गव्हाणे यांच्या नावाने ''हस्ते खुद्द'' असे लिहून मुद्रांक विक्रेते आर. एन. मोरे यांच्याकडून १०० रु. चा बॉण्ड खरेदी केला. त्यावर मयत व्यक्तीची इंग्रजी स्वाक्षरी दाखवली.

त्याच दिवशी नोटरी ॲड. मंगल एच. नेहरकर यांनी कोणतीही शहानिशा न करता मयत व्यक्तीच्या नावाने बोअरवेल नोंदीसाठी शपथपत्र नोटरी केले. त्यावर मयताची मराठीत साधी स्वाक्षरी आहे.

तत्कालीन तलाठी शरद जानकीराम राठोड यांनी दि. १८/०७/२०२४ रोजी मयत व्यक्तीच्या नावाचा अर्ज स्वीकारला. अर्जावर इंग्रजीत किचकट स्वाक्षरी असून वर दि. १७/०७/२०२४ व खाली दि. १८/०७/२०२६ अशा विसंगत तारखा आहेत. तत्कालीन मंडळ अधिकारी लहू भीमराव केदार यांनी दि. २७/०८/२०२४ रोजी कोणतीही शहानिशा न करता फेरफार क्र. १०८२ मंजूर केला. यामुळे फिर्यादी मधुकर गव्हाणे यांचा बोअरवेलमधील कायदेशीर हिस्सा संपुष्टात आला.

**७ जणांवर अजामीनपात्र गुन्हे दाखल होणार ?**

१. अशोक आबासाहेब गव्हाणे, पुतण्या २. ॲड. मंगल एच. नेहरकर, नोटरी ३. आर. एन. मोरे, मुद्रांक विक्रेता ४. शरद जानकीराम राठोड, तत्कालीन तलाठी ५. लहू भीमराव केदार, तत्कालीन मंडळ अधिकारी ६. धर्मराज अप्पाराव कुटूळे, (साक्षीदार )७. अशोक संदिपान शिंदे, (साक्षीदार ) या जणांविरुद्ध तक्रारदार मधुकर गव्हाणे यांनी दि. ०५/०६/२०२६ रोजी धारूर पोलीस ठाण्यात तक्रारीत पोलिसांनी *भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८ फसवणूक, ३३६ बनावट दस्त तयार करणे, ३३७ बनावट दस्त वापरणे, ३३८ महत्वाच्या दस्ताची बनावट, ६१ गुन्हेगारी कट, ३(५) सामाईक हेतू अन्वये अजामीनपात्र गुन्हा नोंदवुन कायदेशीर कारवाई करावी असी लेखी मागणी केली आहे.

* ''मरणोत्तर विटंबना'' - तक्रारदाराचा आरोप*

''माझ्या भावाचा मृत्यू २०२१ ला झाला. कोर्टाने वारसा प्रमाणपत्र दिले. तरीही माझ्या पुतण्याने नोटरी, तलाठी, मंडळ अधिकारी यांना हाताशी धरून माझ्या भावाला कागदावर जिवंत केले. *माझ्या हक्काची जमीन व बोअरवेल हडपण्यासाठी मरणोत्तर माझ्या भावाची विटंबना केली. मी न्यायासाठी उंबरठे झिजवले पण न्याय मिळाला नाही,'' अशी व्यथा तक्रारदार मधुकर गव्हाणे यांनी मांडली.

क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांची मागणी

सर्व आरोपींना तात्काळ अटक*करून सखोल चौकशी करावी.२. तलाठी व मंडळ अधिकारी यांचे निलंबन करून खातेनिहाय चौकशी करावी. ३. नोटरी वकिलाचा परवाना रद्द करण्यासाठी विधी विभागाकडे शिफारस करावी ४.मुद्रांक विक्रेता यांचा परवाना रद्द करावा.

''महसूल विभागातील अधिकाऱ्यांनीच मयताला जिवंत दाखवून जमीन हडपण्यास मदत करणे हा नीचपणाचा कळस आहे. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी अशा प्रकारे बळकावल्या जात असतील तर सामान्य शेतकऱ्याने न्याय कुणाकडे मागायचा?'' असा संतप्त सवाल क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी केलाय.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26